# प्रोसिडींग बुक

सभा नं. 152 ता. २२/०६/२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | महाविद्यालय विकास समितीची पहिली सभा - २०१७-१८ |

पाचोरा ता. स. शि. संस्थेने चालविलेले. सौ. र. ना. दे. कला, वाणिज्य व ~~विज्ञान~~ विज्ञान महाविद्यालयाची शै व २०१७-१८ या वर्षाची महाविद्यालय विकास समितीची पहिली सभा सोमवार दि:- २२-०६-२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेचे चेअरमन तथा म. वि. स. चे अध्यक्ष मा. नानासो संजयजी ओंकार वाघ व मानद सचिव मा. अण्णासो ॲड. ए.स. आर. देशमुख यांचे उपस्थितीत महाविद्यालयात संपन्न झाली.

प्रारंभी मा. प्राचार्य तथा सचिव डॉ. एन. एन. गायकवाड यांनी सभेस उपस्थित असलेल्या मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत करून सभेच्या पुढील कामकाजास सुरवात केली.

१. मा. श्री नानासाहेब संजय ओंकार वाघ - अध्यक्ष
२. मा. श्री. ॲड. अण्णासाहेब सदाशिवराव रावसाहेब देशमुख - सचिव
३. मा. श्री. नानासाहेब विलास त्र्यंबक जोशी - सदस्य
४. मा. श्री. आबासाहेब दत्तात्रय माणिकराव पवार - सदस्य
५. मा. श्री. अण्णासाहेब नानासाहेब बबनराव देशमुख - सदस्य
६. मा. श्री. बाबासाहेब विनय मधुकर जकातदार - सदस्य
७. श्री. प्रा. डॉ. संजय देविदास सोंसे - विभाग प्रमुख
८. श्री. प्रा. सुरेश रामराव पाटील - सदस्य
९. श्री. प्रा. दिपक सोनीराम मराठे - सदस्य
१०. श्रीमती. प्रा. डॉ चित्रा सुकदेव पाटील - सदस्य
११. श्री. प्रा. लक्ष्मण ~~भगो~~ ज्ञानोबा कांबळे - सदस्य (समन्वयक)
१२. श्री. सुनिल रामभाऊ पाटील - अध्यापकेतर सदस्य
१३. श्री. _ _ _ _ _ _ _ _ सदस्य (महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे सभापती)
१४. श्री. _ _ _ _ _ _ _ सदस्य (महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे सचिव)
१५. श्री. प्राचार्य डॉ. नाना नामदेव गायकवाड - (सदस्य सचिव)

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 153 ता.22/06/2018

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | ठराव क्र.1 :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | मा. प्राचार्यांनी मागील सभेचे इतिवृत्त उपस्थित सभेसमोर वाचून दाखविलेले उपस्थित मान्यवरांनी इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी दिली |
| | ठराव क्र 2 :- सन 2018-19 च्या जमाखर्चास मान्यता देणे बाबत व 2018-19 च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणे बाबत | मा. जोगळेकर साहेब यांचे कडून ऑडिट केलेला 2018-19 च्या जमाखर्चाबाबतची प्राचार्यांनी संपुर्ण माहिती दिली व वाचन केले. त्यानंतर मान्यवरांनी जमाखर्चास मान्यता दिली. त्याच प्रमाणे 2018-19 च्या अंदाज पत्रकासही मंजुरी देण्यात आली |
| | ठराव क्र. 3 :- अमवि/2/निवडणूक/15/2018 दि. 15.06-2018 च्या परिपत्रकानुसार नविन विभाग प्रमुखांची नेमणूक करणेबाबत विचारविनिमय करणे बाबत. | विद्यापीठान विविध प्राधिकरणे गठीत करणेसाठी मतदार याद्या तयार करण्याकरीता विभाग प्रमुखांची माहिती पाठविण्यात बाबत विद्यापीठाच्या अमवि/2/निवडणूक/15/2018 दि. 15.06.2018 च्या परिपत्रकानुसार मा. प्राचार्य यांनी सभेपुढे विषय मांडला, त्यावर सर्व साधक बाधक बाबींवर चर्चा होऊन सर्वानुमते असे ठरले की विद्यापीठ प्रचलित नियमानुसार कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील सेवा ज्येष्ठतेनुसार विभाग प्रमुखांची निवड करावी या नुसार खालील प्राध्यापकांना विभाग प्रमुख म्हणून नेमणूक देण्याचे ठरले-<br>1. हिंदी - प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड<br>2. मराठी - प्रा. पी.डी. पाटील<br>3. अर्थशास्त्र - प्रा. डॉ. बी. एस. भालेराव<br>4 इतिहास - प्रा. डॉ. सी. एस. पाटील<br>5 भूगोल - प्रा. डॉ संजय देविदास भैसे<br>6 वाणिज्य - प्रा. डॉ. एस. एन. हाडोळतीकर<br>7. व्या. अर्थशास्त्र - प्रा. डॉ. बी. एस. भालेराव<br>8. रसायनशास्त्र - प्रा. एस. आर. पाटील<br>9. वनस्पती शास्त्र - डॉ. एन. व्ही. पिंपळकर<br>10 प्राणिशास्त्र - प्रा. रा. एन. मंगारके |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 15

ता. २२/०८/२०१६

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | | ११. गणित - प्रा. व्ही. टी. बागुल<br>१२. क्रिडा विभाग - प्रा. डि. एच. नांदके<br>१३. ग्रंथालय विभाग - प्रा. रचना मा. गजभिये<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सूचक - डॉ. एन. एन. गायकवाड<br>अनुमोदक - मा. नानासो विलास त्र्यंबक जोशी सर |
| | ठराव क्र-४ महाविद्यालयातील सर्व शैक्षणिक विभागांसाठी लागणाऱ्या साहित्यांची खरेदी व दुरुस्ती संबंधी विचार विनिमय करणे | महाविद्यालयातील सर्व शैक्षणिक विभागांसाठी लागणाऱ्या साहित्यांची खरेदी व दुरुस्ती संबंधी विचार विनिमय करून संबंधित साहित्याची यादी व दुरुस्ती साठी त्या भागाची पाहणी करण्यात आली व त्याप्रमाणे दुरुस्तीस परवानगी देण्याचे सर्वानुमते ठरले.<br>सूचक - उप. प्रा. श्री. एस. आर. पाटील<br>अनुमोदक - श्री. दत्तात्रय आबा पवार |
| | ठराव क्रं-५ आता पर्यंत इमारतीचे झालेल्या कामाचा आढावा घेणे व पुढील कामासाठी मार्गदर्शन | मान्यवरांना मा प्राचार्य यांनी नवीन इमारतीचे सुरु असलेल्या कामाविषयी माहिती दिली व संबंधीतांशी चर्चा केली व चालू आलेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले.<br>सूचक: प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड<br>अनुमोदक: मा. बाबासो विजय कातदार |
| | ठराव क्रं-६ श्री. राजेंद्र बाबुराव मराठे ग्रंथालय परिचर यांच्या बेशिस्त वागणुकी बाबत. | श्री. राजेंद्र बाबुराव मराठे, ग्रंथालय परिचर, प्रशासकीय कामाविषयी परवानगी न घेता वारंवार परस्पर गैरहजर रहतात. त्यांचे कामात लक्ष नसते, त्याच प्रमाणे कामात अनियमितता आहे. वरिष्ठांनी सांगितलेली कामा ~~लक्ष~~ नसते, न करणे |

# प्रोसिडींग बुक



ता.22/08/2018

| विषय | ठराव |
|---|---|
| | कामात ढकलाढकल करणे, उलट उत्तर देणे व बेशिस्त वागणे त्या संबंधी त्यांना 20.12-2016, 13-06-2017, व 17-06-2018 असे वारंवार पत्र देऊनही मराठे यांचे कडून पत्राचे उत्तर आले नाही व त्यांच्या वागणुकीत कोणताही बदल झालेला नाही.<br>या सर्व बाबींचा विचार केला असता त्यांना शिक्षा करण्याच्या हेतूने व यापुढील काळात त्यांनी वागणूक सुधारावी यासाठी सर्व मान्यवरांनी विचार विनिमय करून त्यांची भविष्यात वागणूक सुधारेल अशी लेखी हमी मा. प्राचार्य यांनी श्री. मराठे यांच्याकडून घेतली.<br>परंतु आता पर्यंत केलेल्या चुका लक्षात घेता व या पुढे अशा प्रकारच्या चुका होणार नाही यासाठी 2017-18 या 1 वर्षाकरीता वेतन वाढ रोखण्यात यावी असे चर्चेअंती सर्वानुमते ठरले.<br>सूचक :- मा. प्राचार्य मन. दा. गायकवाड<br>अनुमोदक :- मा. नानासो विलास त्र्यंबक जोशी सर |
| ठराव क्र 08:- माननीय अध्यक्ष यांच्या परवानगी ने आयत्या वेळी आलेल्या विषयासंदर्भात विचार विनिमय करणे | माननीय अध्यक्ष यांच्या समोर आयत्या वेळी कोणताही अर्ज किंवा विषय न आल्यामुळे सर्वांचे आभार मानून सभा संपविण्यास मा. अध्यक्षांनी परवानगी दिली. |

प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती
सौ.र.ना.दे. कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, भडगांव जि. जळगाव

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 158 ता२८ /०३ /२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|

महाविदयालयाच्या, महाविदयालय विकास समितीची बैठक, नविन महाराष्ट्र सार्वजनिक विदयापीठ अधिनियम 2016-च्या कलम 97(1) अन्वये, शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील, दुसरी सभा 28/03/2018 रोजी दुपारी 4.00 वाजता ग्रा.ता.सह.शि. संस्थेने चालविलेल्या भडगांव येथिल सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय भडगांव येथे. मा. नानासो. संजय ओंकार वाघ चेअरमन यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली.

सदर सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

1) मा. श्री. नानासाहेब संजय ओंकार वाघ - अध्यक्ष.

2) मा. श्री. नानासाहेब विलास त्र्यंबक जोशी सदस्य (शिक्षणक्षेत्र)

3) मा. श्री. आबासाहेब दत्तात्रय माणिकराव पवार सदस्य (उद्योगक्षेत्र)

4) मा. श्री. आप्पासाहेब नानासाहेब बबनराव देशमुख सदस्य (संशोधनक्षेत्र)

5) मा. श्री. बाबासाहेब विनय मधुकर जकातदार सदस्य (समाजसेवाक्षेत्र)

6) श्री. प्रा. डॉ. संजय, देविदास घोसे.
(प्राचार्य किंवा परीसंस्था प्रमुखाद्वारे नामनिर्देशित विभाग प्रमुख.)

7) श्री. प्रा. सुरेश. आर. पाटील. सदस्य (अध्यापक प्रतिनीधी)

8) श्री. प्रा. दिपक. मो. मराठे. सदस्य (अध्यापक प्रतिनीधी)

9) श्रीमती प्रा. डॉ. चित्रा. सु. पाटील सदस्य (अध्यापक महिला प्रतिनिधी)

10) श्री. प्रा. लक्ष्मण. त्र्या. कोबळे सदस्य.
(समन्वयक, महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी समिती)

11) श्री. सुनिल. श. पाटील, अध्यापकेत्तर सदस्य.

12) श्री. सभापती, महाविद्यालय विद्यार्थी परिषद

13) श्री. सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद

14) श्री. प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड - सदस्य. सचिव.

# प्रोसिडींग बुक

ता. २८ / ०३ / २०१८.

दि २८-३-२०१८ रोजी महाविद्यालय विकास समितिच्या दुसऱ्या सभेचे इतिवृत्त

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेने चालविलेल्या सौ. र. ना. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची शै. व. २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची महाविद्यालय विकास समितीची दुसरी सभा बुधवार दि. २८-३-२०१८ रोजी सकाळी १०:०० वाजता संस्थेचे चेअरमन मा. नानासो संजयजी ओंकार वाघ यांचे उपस्थितीत संपन्न झाली.

सभेच्या सुरुवातीला महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन व इतर सर्व सन्माननीय सदस्य यांनी संस्थेचे दिवंगत मानद सचिव मा. आण्णासो ॲड. श्री सदाशिवराव रावसाहेब देशमुख यांना २ मिनिट उभे राहून श्रद्धांजली वाहिली तसेच संस्थेचे सन्माननिय अध्यक्ष मा. भाऊसाहेब दिलीप ओंकार वाघ यांचे सुपुत्र श्री. भुषण दिलीप वाघ हे नुकत्याच झालेल्या नगरपरिषद पाचोरा निवडणूकीत बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल व गो. से. हायस्कुलचे मुख्याध्यापक मा. श्री. एस. डी. पाटील यांना शिक्षण भारती हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने दोघांच्या अभिनंदनाचा ठराव पास करण्यात आला व त्यानंतर सभेला सुरुवात झाली.

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | ठराव क्र. १ - मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे बाबत ... | मा. प्राचार्य यांनी मागिल सभेचे इतिवृत्त उपस्थितांसमोर वाचून दाखविले व उपस्थित मान्यवरांनी इतिवृत्त कायम करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. |
| | ठराव क्र. २ - महाविद्यालयातील सन २०१७-१८च्या दि. १।४।२०१७ ते ३१।१०।२०१७ पर्यंतच्या जमाखर्चास मंजूरी देणे-मिळणे बाबत. | महाविद्यालयातील सन २०१७-१८च्या दि १।४।२०१७ ते दि ३१-१२-२०१७ पर्यंतच्या जमाखर्चबाबत सविस्तरपणे चर्चा करण्यात आली म. मा. नानासो व्ही. टी. जोशी यांच्या मार्गदर्शनात काही सुधारणा करण्यात आल्या व त्यासंबंधीच्या पुढील अंमलबजावणी करण्यास सांगण्यात आले. सर्वांच्या संमतीने दि १।४।२०१७ ते ३१।१२।२०१७ चा जमाखर्च मंजूर करण्यात आला.<br>सूचक :- मा. नानासो व्ही. टी. जोशी.<br>अनुमोदक :- मा. आबासो दत्तात्रय पवार. |

मागे पहा –

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 160 ता. / /२००

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | <u>ठराव क्र-३</u> – महाविद्यालयात अनुदानित तसेच विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गाच्या विविध विषयांच्या प्रा.ना.स. शि.संने दुसऱ्या सत्रासाठी (२०१७-१८) तासिका तत्वावर दि-१-१२-२०१७ ते ३१-३-२०१८ कालावधीसाठी नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीस विद्यापिठ परिनियम ४१५ (३) नुसार मान्यता देणेबाबत. – | महाविद्यालयात अनुदानित तसेच विना अनुदानित तत्वावर सुरु असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गाच्या विविध विषयांच्या प्रा.ना.स.शि.संस्थाने दुसऱ्या सत्रासाठी (२०१७-१८) तासिका तत्वावर दि १-१२-२०१७ ते ३१-३-२०१८ या कालावधी-साठी नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीस<br><br><u>अनुदान तत्वावर</u><br>रसायन शास्त्र – १) डॉ. बालाजी हुकुमचंद पाटील<br>२) श्री. अनिल रामकृष्ण पाटील<br>३) कु. यामिनि रविंद्र पाटील<br>४) श्री. सागर सुरेश पाटील<br>फिजिक्स – १) कु. नेहा निलेश मालपुरे<br>हिंदी – १) कु. शेतली वासुदेव सोनवणे<br>इतिहास – १) श्रीमती मंजुश्री आप्पासाहेब जाधव<br>२) श्री प्रदिप भगवान गायकवाड<br>अर्थशास्त्र – १) श्री देवरे जनार्दन जानकी<br>२) श्री श्रावण रविंद्र कोळी<br>वाणिज्य – १) कु. अग्रवाल सुरेश रामेश्वर<br>२) श्री चेतन अशोक पाटील<br>३) श्री भुषण कृष्णा वानखेडे<br><u>विना-अनुदान तत्वावर</u><br>कॉम्प्युटर सायन्स – १) कु. निकिता अरुण येवले<br>२) श्री अनिल पांडुरंग महाजन<br><br>सुचक :– प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड<br>अनुमोदक :– मा. आण्णासो नानासाहेब ब. देशमुख |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 161 ता. २५ / ३ /२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | ठराव क्र. ४ – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या (महाराष्ट्र शासनाचे) यांचे दि. २९ जानेवारी २०१८ च्या शिष्यवृत्ती, शिक्षणशुल्क, परीक्षा शुल्क इ. संदर्भात सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ११ वर विचारविनिमय करणे बाबत. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (म.शा.चे) विभागाच्या यांचे दि. २९ जानेवारी २०१८ च्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा विभाग इ. संदर्भात सदर परिपत्रकातील मुद्दा क्र. ११ वर विचारविनिमय महाविद्यालयाच्या हिताच्या दृष्टीने संबंधित सरकारने काढलेले संबंधित परिपत्रक हे महाविद्यालयास घातक ठरू शकेल. म्हणून या परिपत्रकाचा निषेद करून, ही बाब प्राचार्य फोरमच्या मिटींगमध्ये प्रकर्षाने मांडावी असे मा. प्राचार्यांना सुचित करण्यात आले.<br>सुचक :– मा. आण्णासो नानासाहेब बबनराव देशमुख<br>अनुमोदक :- मा. बाबासाहेब विजय मधुकर जकातदार |
| | ठराव क्र. ५ नविन इमारतीच्या आतापर्यंत आलेल्या जमाखर्चाचा आढावा घेणे, निधी उभारणे संदर्भात विचार-विनिमय करणे. | १) नविन इमारतीच्या आतापर्यंत आलेल्या जमाखर्चाचा आढावा घेण्यात आला व महाविद्यालयाच्या कला, व वाणिज्य या शाखा नविन महाविद्यालयाच्या नविन जागेत स्थलांतरीत करण्यात याव्या असे सर्वानुमते ठरले.<br>महाविद्यालयाच्या विकासासाठी निधी कसा उभारावा यासंदर्भात चर्चा झाली असता मा. चेअरमनसो, नानासो संजयजी वाघ यांनी पुढील शैक्षणिक वर्षात एम.ए. मराठी, एम.ए. भुगोल व एम.एस्सी - रसायनशास्त्र त्याचप्रमाणे बी.बी.ए. व बी.बी.एम. यासारखे नविन अभ्यासक्रम तसेच महिला महाविद्यालय चालु करणेसंदर्भात विद्यापिठाशी चौकशी करावी व त्यानंतर चौकशी केल्यासंदर्भात कार्यवाही केल्यानंतर मा. प्राचार्य यांनी संस्थेशी त्यासंदर्भात चर्चा करावी असे सांगितले.<br>२) जादा निधीसाठी पाचोरा पिपल्स बँक पाचोरा येथे ४० लाख ते ५० लाखापर्यंतचे कर्ज घ्यावे असे सर्वानुमते ठरले व त्यासाठी पाचोरा पिपल्स बँक शाखा भडगाव येथे मा. चेअरमन व मा. व्हा. चेअरमन यांच्या सहयांच्या अधिकाराने बँक खाते उघडावे असे सर्वानुमते ठरले |

मागे पहा.

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 162 ता. / /२००

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | ३) ३) येत्या २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या नविन इमारतीचे बांधकाम पुर्ण होत आहे. त्यासंदर्भात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, व्यवस्थापन विभाग यांचेकडे स्थानांतरासंबंधी प्रस्ताव पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले<br>सुचक – मा. विलास त्र्यंबक जोशी.<br>अनुमोदक – डॉ. संजय देविदास शेळके. |
| | ठराव क्र-६<br>शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आलेल्या अर्जावर विचार-विनिमय करणे | १ श्री. रामदास दगडू चौधरी (शिपाई) यांची २४ वर्ष सलग सेवा झाली असल्यामुळे त्यांना आश्वासित संधीचा लाभ मिळावा अशी शिफारस मा. प्राचार्य यांनी सभेला केली व ती मान्य करण्यात आली असता सदर प्रकरण मा. सहसंचालक, जळगाव यांचेकडे मंजुरीसाठी पाठवावे असे सर्वानुमते ठरले.<br>२) वाढती विद्यार्थी संख्या, महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण विभाग तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ यांच्या बदललेल्या कार्यपद्धतीनुसार नवनियुक्त लिपिक श्री संदिप केदार यांना एकट्याला भार होईल म्हणून महाविद्यालयास कार्यालयात मदत म्हणून श्री प्रकाश रंगनाथ सोनवणे व श्री सुरेश सुपडू चव्हाण हे नियत सेवा नियमानुसार निवृत्त झालेले आहेत परंतु त्यांना परत कामासाठी संस्थेने संधी दिलेली आहे. त्यांच्या मानधनाचा अर्ज विचारार्थी ठेवण्यात आला असता सर्वानुमते त्यांच्या मानधनात ७०००/- रु वरुन जून २०१८ पासून ९०००/- रु. वाढ करण्यात ~~आली~~ यावी असे सर्वानुमते ठरले |

# प्रोसिडींग बुक

ता. २८/३/२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | | ३) श्री अरुण शिवराम माळी हे दि १।८।१९९० पासून भडगाव महाविद्यालयात प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून कायम सेवेत आहेत. त्यांना दि १।८।२००२ पासून पहिली कालबद्ध पदोन्नती व दि १।८।२०१४ पासून दुसरी २४ वर्षानंतरची आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेला आहे. आता त्यांना अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यक पदाला पुढील पदोन्नतीची संधी नसल्यामुळे शिक्षण संचालनालयाकडील पत्र क्र. उ.शि.सं/२०१३/शिक्षकेत्तर बैठक/मवि-१/६६६८ दि २० सप्टें. २०१३ नुसार ग्रेड वेतन २६५० करुन ग्रेड वेतन ४२००-करुन मिळणेसाठी शिफारस मा. प्राचार्य यांनी सभेला केली व ती मान्य करण्यात आली असता श्री अरुण शिवराम माळी यांचे सरकारी नियमानुसार मा. सहसंचालक सो जळगाव यांचेकडे प्रकरणे मंजूरीसाठी पाठवावे असे सर्वानुमते ठरले. |
| | | ४) प्रा. डॉ. विमा सुकदेव पाटील (सहा. अधिव्याख्याता) यांनी पी.एच.डी. नोटीफिकेशन पत्र क्र. उमवि/११/पी-एच.डी./इतिहास/२१२४/२०१६ दि ७।७।२०१६ मिळालेले आहे. तसेच त्यांना विद्यापीठाने पत्र क्र. उमवि/१८/ज-१५५/९७ दि ६।१।१९९७ संदर्भ या पत्राद्वारे त्यांच्या परिनियम ४१५(१) अन्वये केलेल्या नेमणूकीस नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली होती परंतु डॉ. विमा सुकदेव पाटील (सहा. अधिव्याख्याता) यांनी दि ७।७।२०१६ रोजी पी.एच.डी. प्राप्त केली असल्यामुळे विद्यापीठाने व्याख्याता म्हणून मान्यता पत्रात नमुद केलेली नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट दि. ७।७।२०१६ पासून वगळलेली आहे. तरी त्यांना नियमानुसार तीन वेतनवाढ देण्यासाठी त्यांचा प्रस्ताव मा. सहसंचालक जळगाव यांचेकडे पाठविण्यास ही सभा मंजूरी देत आहे |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 164      ता. २८/3/२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | ५) श्री. राजेंद्र बाबुराव मराठे यांच्या वेतनवाढीच्या संदर्भात अर्जाचा विचार केला असता प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांच्या अहवालानुसार श्री राजेंद्र बाबुराव मराठे यांची वागणूक सुधारलेली असून त्यांचे काम आता समाधानकारक आहे. तरी त्यांची शै-व-२०१७-१८ मध्ये रोखलेली वेतनवाढ ही शै-व-२०१८-१९ पासून पुढे चालू करण्यात यावी अशी शिफारस केली. सभेने प्राचार्य यांच्या अहवालानुसार शै-व- २०१८-१९ पासून पुढे वेतनवाढ देण्यासंदर्भात विचार विनिमय करून वेतनवाढ सुरु करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. |
| | | सुचक - मा. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड |
| | | अनुमोदक - मा. आबासो दत्तात्रय मा. पवार |
| | ठराव क्र. ७ | |
| | मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे. | आयत्या वेळेस कोणताही विषय अथवा अर्ज न आल्यामुळे मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्वांचे आभार मानुन सभा संपविण्यास अध्यक्षांनी परवानगी दिली. |

प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती
सौ.र.ना.दे. कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, भडगांव जि. जळगाव

# प्रोसिडींग बुक

ता. २२/१०/२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |

महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची बैठक नविन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापिठ अधिनियम २०१६च्या कलम ९७(१) अन्वये शै. व. २०१८-१९ मधील पहीली सभा आज दि. २२-१०-२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता पाचोरा तालुका सह. शिक्षण संस्थेने चालविलेल्या भडगाव येथील कै. र. ना. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगाव येथे मा. नानासो संजय ओंकार वाघ - चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर सभेस खालील मान्यवर उपस्थित होते:

१ मा. नानासो संजय ओंकार वाघ – अध्यक्ष (चेअरमन पा. ता. सह. शि. संस्था पाचोरा)
२ मा. नानासो विलास त्र्यंबक जोशी - सदस्य (शिक्षणक्षेत्र) -
३ मा. आबासो दत्तात्रय माणिकराव पवार - सदस्य (उद्योगक्षेत्र) -
४ मा. आप्पासो नानासाहेब वजनराव देशमुख - सदस्य (संशोधनक्षेत्र) -
५ मा. बाबासो विनय मधुकर जकातदार - सदस्य (समाजसेवा क्षेत्र) -
६ प्रा. डॉ. संजय देविदास भैसे (प्राचार्य किंवा परिसंस्था प्रमुखाद्वारे नामनिर्देशित विभाग प्रमुख) -
७ प्रा. दिपक मोतीराम मराठे - सदस्य - (अध्यापक प्रतिनिधी) -
८ श्रीमती प्रा. डॉ. चित्रा सुकदेव पाटील - सदस्य (अध्यापक महीला प्रतिनिधी) -
९ प्रा. लक्ष्मण ग्यानोबा कांबळे - सदस्य - (समन्वयक, महाविद्यालयाअंतर्गत गुणवत्ता हमी समिती) -
१० श्री. सुनिल रामभाऊ पाटील - अध्यापकेतर सदस्य -
११ प्रा. सुरेश रामराव पाटील - सदस्य - (अध्यापक प्रतिनिधी) -
१२ सभापती महाविद्यालय विद्यार्थी परीषद -
१३ सचिव - महाविद्यालय विद्यार्थी परीषद -
१४ मा. प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड - सदस्य सचिव -

22/10/2018

प्रारंभी मा. प्राचार्य तथा म. विकास समितीचे सचिव डॉ. एन. एन. गायकवाड यांनी सभेस उपस्थित मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात केली.

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 168 ता. २२/१०/२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | ठराव क्र. १<br>मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची बैठक दि. २८-३-२०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले सर्व उपस्थित सदस्यांनी त्यावर चर्चा करून इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी दीली.<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| | ठराव क्र. 2.<br>सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील जमाखर्चास मंजूरी देणे तसेच आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ च्या अनामत रकमा परत करणेसंबंधी विचारविनिमय करणे. | सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षातील जमाखर्चाच्या अंकेक्षण अहवाल सभेपुढे सादर करण्यात आला व त्यातील सर्व बाबींचा विचार करून मा. जोगवेकर सो यांनी दर्शविलेली अनामत रकमेची सुचना सर्व संबंधितांना लक्षात आणून देण्यात आली व त्यांनी घेतलेल्या अनामतीचा हिशेब तात्काळ कार्यालयात सादर करण्याचे आदेश देऊन २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या अंकेक्षण अहवालास मंजूरी देण्यात आली<br>सूचक :- मा. आबासो दत्तात्रय माणिकराव पवार<br>अनुमोदक :- मा. आण्णासो नानासाहेब बबनराव देशमुख |
| | ठराव क्र- 3<br>दि. १ एप्रिल २०१८ ते ३० जून २०१९ च्या जमा खर्चास मंजूरी देणे | दि. १ एप्रिल २०१८ ते ३० जून २०१९ च्या जमाखर्च अहवाल सभेपुढे वाचून दाखविण्यात आला सभेमध्ये जमाखर्चावर सर्वकष चर्चा होऊन जमाखर्चास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>सूचक - प्रा. डॉ. एस. डी. भैसे<br>अनुमोदक - प्रा. लक्ष्मण सोनोबा कांबळे. |

# प्रोसिडींग बुक

ता. २२/१०/२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | **ठराव क्र.- ४**<br>शै.व-२०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणेबाबत.. | शै.व-२०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रक सभेपुढे वाचून दाखविण्यात आले. यावर सभेमध्ये चर्चा होऊन अंदाजपत्रकास सभेने एकमताने मंजूरी दिली. |
| | **ठराव क्र.- ५**<br>नविन इमारत स्थलांतर झाल्यानंतर प्राचार्य व कार्यालयात फर्निचर सेमिनार हॉल इ.साठी वर्ग खोल्यांमध्ये बेंचेस, पंखे व इमारतीच्या चोहोबाजूने फोकस लाईट इ. बसविण्याबाबत निर्णय घेणे व खर्चास अनुमती देणेबाबत | नविन इमारत स्थलांतर झाल्यानंतर प्राचार्य व कार्यालयात फर्निचरसाठी वर्ग खोल्यांमध्ये बेंचेस, पंखे, सुशोभित सेमिनार हॉल (लाकडी मंच, पर्दे, प्रोजेक्टर १० बाय १५ ची कलरमॅटसह) व इमारतीच्या चोहोबाजूने फोकस लाईट इ. बसविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली त्यात खालीलप्रमाणे ठरविण्यात आले. प्राचार्य व कार्यालयात आवश्यक ते नवीन फर्निचर करून उर्वरित असलेल्या उपलब्ध साधनातून तयार करण्यात यावे. वर्ग खोल्यामध्ये नविन १०० बेंचेसची ऑर्डर वृषभ फर्निचर शेंदुर्णी यांना देण्यात यावी. तसेच इमारतीच्या समोरील एका बाजूने तुर्तास फोकस लावावा. व नंतर हळूहळू इतर बाजुस आवश्यकतेनुसार फोकस लावावे असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक — प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड.<br>अनुमोदक — नानासो व्ही. टी. जोशी. |
| | **ठराव क्र. ६**<br>यु.जी.सी. अंतर्गत प्राप्त अखर्चित अनुदान युजीसीला परत करणे बाबत व त्याबाबतची जबाबदारी निश्चित करणेबाबत | यु.जी.सी. अंतर्गत प्राप्त झालेले अनुदान संबंधित बाबींवर खर्च न झाल्यामुळे सदर अखर्चित अनुदान युजीसीला परत ~~करून~~ करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले व युजीसीने सदर परत केलेले अनुदानासाठी नुकसान झाल्यास याशी संबंधित सर्व समिती प्रमुख व सदस्य यांच्येवर जबाबदारी निश्चित करावी व यापुढे असे होऊ नये म्हणून सुचना देण्यात आल्या.<br>सुचक — नानासो व्ही. टी. जोशी.<br>अनुमोदक — प्रा. सुरेश रामराव पाटील. |
| | **ठराव क्र.- ७**<br>महाविद्यालयाच्या नविन इमारतीच्या मागील बाजुस पुरुष विद्यार्थ्यांसाठी | महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या मागील बाजुस पुरुष विद्यार्थ्यांसाठी युजीसीच्या नियमानुसार स्वतंत्र नविन सर्व सोयींनियुक्त सुलभ शौचालय बांधण्यात यावे. असे |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 168 ता. २२/१०/२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | युजीसीच्या नियमांनुसार स्वतंत्र नविन सर्व सोयीनियुक्त सुलभ शौचालय बांधून घेणेबाबत | सभेने एकमताने मंजूरी दीली. परंतू निधीअभावी सदर बांधकाम पुढील शैक्षणिक वर्षात करावे ~~असे~~ व तात्पुरती व्यवस्था करून देण्याचे ठरले. या साठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देणेत आली.<br>सुचक — प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड.<br>अनुमोदक — आण्णासो नानासाहेब बबनराव देशमुख. |
| | **ठराव क्र. ८**<br>महाविद्यालयाच्या नविन व जुन्या इमारतीच्या आवारात तातडीने डे-नाईट सुरक्षा रक्षक नेमणेबाबत तसेच महाविद्यालयाच्या शिक्षकेत्तर कर्मचारी सेवानिवृत्ती तथा मयतीमुळे रिक्त झालेल्या पदावर तातडीने रोजंदारीच्या हिशोबाने कर्मचारी नेमणेबाबत.... | महाविद्यालयाच्या नविन व जुन्या इमारतीच्या आवारात तातडीने डे-नाईट सुरक्षा रक्षक नेमणेबाबत, तसेच महाविद्यालयाच्या शिक्षकेत्तर कर्मचारी सेवानिवृत्ती तथा मयतीमुळे रिक्त झालेल्या पदावर तातडीने रोजंदारीच्या हिशोबाने कर्मचारी नेमणेस सभेत एकमताने मंजुर करण्यात आले. व होणारा खर्च महाविद्यालयाने भागवावा असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक — डॉ. संजय देविदास भैसे<br>अनुमोदक — प्रा. डॉ. किरा सुकदेव पाटील. |
| | **ठराव क्र. ९**<br>महाविद्यालयात अनुदानित तसेच विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गाच्या विविध विषयांच्या पा. ता. स. शि. संस्था पाचोराने ~~विविध विषयांच्या~~ पहिल्या व दुसऱ्या सत्रासाठी (२०१८-१९) तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीस विद्यापिठ परिनियम ४९५(३) नुसार मान्यता देणेबाबत विचार विनिमय करणे. | महाविद्यालयात अनुदानित तसेच विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गाच्या विविध विषयांच्या पा. ता. सह. शिक्षण संस्था, पाचोरा ने पहील्या व दुसऱ्या सत्रासाठी (२०१८-१९) तासिका तत्वावर विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेता दि ०२-०७-२०१८ ते ३१-१०-२०१८ व १-१२-२०१८ ते ३१-३-१९ या कालावधीत नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीस विद्यापिठ परिनियम ४९५(३) नुसार मान्यता देणेबाबत..<br>अनुदानित तत्वावर — |

| अ.क्र. | नाव | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री. बालाजी हु. पाटील | रसायनशास्त्र | ०२-७-१८ ते ३१-३-१९ |
| २ | श्री. अजित श. पाटील | -॥- | -॥- |
| ३ | श्री. सागर सुरेश पा. | -॥- | -॥- |
| ४ | कु. यामिनि रविंद्र पा. | -॥- | -॥- |
| ५ | कु. क्रांती वासुदेव सोनवणे | हिंदी | -॥- |
| ६ | कु. नेहा निलेश मालपूरे | पदार्थविज्ञान | -॥- |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 169 ता. २२/१०/२०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | |

| अ.क्र. | नाव | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| ७ | कु. मंजुश्री आप्पासाहेब जा. | इतिहास | ०२-०७-१८ ते ३१-३-१९ |
| ८ | श्री प्रदिप भगवान वाघ | इतिहास | —"— |
| ९ | श्री जनार्दन जा. देवरे | अर्थशास्त्र | —"— |
| १० | श्री श्रावण रा. कोळी | अर्थशास्त्र | —"— |
| ११ | श्री अजय जा. गायकवाड | अर्थशास्त्र | —"— |
| १२ | कु. मोनल अ. ठाकरे | इंग्रजी | —"— |
| १३ | श्री भुषण कृ. वानखेडे | वाणिज्य | —"— |
| १४ | श्री चेतन अशोक पा. | वाणिज्य | —"— |
| १५ | श्री अक्षय पंडीत शेंडे | वाणिज्य | —"— |

विना अनुदानित तत्वावर –

| अ.क्र. | नाव | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री अनिल पांडुरंग महाजन | संगणकशास्त्र | ०२-०७-१८ ते ३१-३-१९ |

**ठराव क्र. १०.**
शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आलेल्या अर्जावर विचार विनिमय करणे

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यांसाठी आलेल्या अर्जावर विचार विनिमय करणे.

| नाव | मागणी | निर्णय |
|---|---|---|
| श्री दिलीप शब्बीर तडवी | कालबद्ध पदोन्नती मिळणेबाबत | कालबद्ध पदोन्नतीचे परिपत्रक रद्द केले आहे. परंतु सदर योजना जर शासनाने पुन्हा सुरु केल्यास संबंधित कर्मचाऱ्यास सदर योजनेचा लाभ देण्यास हरकत नाही |
| श्रीमती रचना माणिकराव गजभिये | स्टेज १ मधून स्टेज २ मध्ये जाण्यासाठी | नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी. |
| प्रा. डी. एच. तांदळे | खेळाडूंच्या सरावासाठी व खेळाडूंना बाहेरगावी पाठविण्यासाठी अनामत रक्कम मिळणेबाबत. | प्राचार्यांनी आवश्यक तेव्हा अतिआवश्यक रक्कम उपलब्ध करुन देण्याचे करावे. |
| प्रा. एस. आर. पाटोळे | प्रयोगशाळेतील शिपाई आर. डी. चौधरी यांचे निधन झाल्यामुळे एक सहाय्यक उपलब्ध करुन मिळणेबाबत. | असलेल्या कर्मचारी वर्गात तुर्त भागवण्यात यावे शासनाने मागणी मान्य केल्यास सहाय्यक उपलब्ध करुन देण्याचे करावे. |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 170 ता. २२/१०/२०१९

| विषय नं. | विषय | ठराव | | |
|---|---|---|---|---|
| | | नाव | मागणी | निर्णय |
| | | सर्व शिक्षकेतर | पाचोरा येथे नेहमी | पाचोरा येथे नेहमी |
| | | कर्मचारी वर्ग | महाविद्यालयाच्या कामासाठी | कामासाठी जाणाऱ्या |
| | | | शिक्षकेतर कर्मचारी वर्ग | शिक्षकेतर कर्मचारी |
| | | | जातो त्यांना ५०रु वाहन | यांना ५०रु. वाहनखर्च |
| | | | खर्च देण्यात येतो परंतु | ऐवजी ७०रु वाहनखर्च |
| | | | पेट्रोलचे दर वाढल्यामुळे | देण्यात यावे. |
| | | | वाढ करुन देण्याचे करावे | |
| | | श्री अरुण | एकत्रित सेवाजेष्ठता यादीत | श्री अरुण वाणी यांचा |
| | | शिवराम | नाव समाविष्ट करण्यात | अर्ज पुढील कार्यवाहिसाठी |
| | | वाणी | यावे. | संस्था कार्यालयात वर्ग करावा |
| | ठराव क्र - ११<br>मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांवर विचार विनिमय करणे. | आयत्यावेळी कोणताही अर्ज मा. अध्यक्षांसमोर आला नाही. त्यामुळे अध्यक्षांच्या परवानगीने सर्वांचे आभार मानुन सभा संपविण्यात आली. | | |

प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती
सौ.र.ना.दे. कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, भडगांव जि. जळगाव

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 171 ता. १०/ २ /२०१९.

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|

महाविद्यालय विकास समितीची सभा २०१८-१९.

महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची बैठक नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापिठ अधिनियम २०१६च्या कलम ९७(१) अन्वये शै.व. २०१८-१९ मधील पहीली सभा आज दि. १०-२-२०१९ रोजी दु. ४.०० वा. पा.ता. सह.शिक्षण संस्थेने चालविलेल्या भडगाव येथील सौ. र.ना. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगाव येथे मा. नानासो संजय ओंकार वाघ - चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर सभेस खालीलप्रमाणे मान्यवर उपस्थित होते.

१ मा. श्री. नानासो संजय ओंकार वाघ — अध्यक्ष

२. मा. श्री. नानासो विलास त्र्यंबक जोशी — सदस्य (शिक्षणक्षेत्र)

३ मा. श्री. आबासो दत्तात्रय माणिकराव पवार — सदस्य (उद्योगक्षेत्र).

४ मा. श्री. आण्णासो नानासाहेब बबनराव देशमुख - सदस्य (संशोधनक्षेत्र)

५ मा. श्री. बापूसो विनय मधुकर जकातदार - सदस्य (समाजसेवाक्षेत्र)

६ श्री. प्रा. डॉ. संजय देविदास भैसे - (प्राचार्य किंवा परिसंस्था प्रमुखाद्वारे नामनिर्देशित विभागप्रमुख)

७. — " — सुरेश रामराव पाटील - सदस्य (अध्यापक प्रतिनिधी).

८ श्रीमती प्रा. डॉ. विना सुकदेव पाटील - सदस्या (अध्यापक महिला प्रतिनिधी).

९. श्री. प्रा. दिपक मोतीराम मराठे - सदस्य (अध्यापक प्रतिनिधी).

१०. — " — लक्ष्मण ज्ञानोबा कांबळे - सदस्य (समन्वयक, महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी समिती -

११ श्री. सुनिल रामभाऊ पाटील - अध्यापकेत्तर सदस्य) -

१२. श्री. सभापती, महाविद्यालय विद्यार्थी परिषद -

१३ श्री. सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद -

१४ श्री. प्राचार्य डॉ. एन.एन. गायकवाड - सदस्य सचिव

प्रारंभी मा. प्राचार्य तथा महाविद्यालय विकास समितीचे सचिव डॉ. एन.एन. गायकवाड यांनी सभेस उपस्थित मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात केली.

| विषय | ठराव |
|---|---|
| ठराव क्र. १. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची बैठक दि. २२-१०-२०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले सर्व उपस्थित सदस्यांनी त्यावर चर्चा करुन इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी दिली. ठराव सर्वानुमते मंजूर<br>सुचक — नानासो. व्ही.टी. जोशी.<br>अनुमोदक — प्रा. सुरेश रामराव पाटील |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 172

ता. १०/ २ /२०१९

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | **ठराव क्र. २.**<br>सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात महाविद्यालयाकडे थकबाकी असलेल्या थकबाकी देण्यासंदर्भात विचारविनिमय करणे. | सन २०१८-१९ च्या आर्थिक वर्षातील महाविद्यालयाकडे असलेल्या थकबाकी संबंधी चर्चा करण्यात आली व सदर थकबाकीदारांची यादी तयार करून संस्था कार्यालयात सादर करण्यास सर्वानुमते ठरले.<br>सूचक — मा. [illegible]<br>अनुमोदक — [illegible] |
| | **ठराव क्र. ३.**<br>शै. व. २०१९-२० नवीन शैक्षणिक नियमावलीनुसार तासिका तत्वावर विद्यापीठ परिनियम ४७५ (३) नुसार अधिव्याख्यात्यांची नेमणूक करण्यासाठी नियोजन करणेबाबत. | शै. व. २०१९-२० नवीन शैक्षणिक नियमावलीनुसार तासिका तत्वावर विद्यापीठ परिनियम ४७५(३) नुसार अधिव्याख्यात्यांची नेमणूक करण्यासाठी शासनाने व विद्यापीठाने तयार केलेल्या नवीन नियमावलीनुसार, नवीन कार्यभारानुसार कार्यभार व रिक्त जागांना मा. सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडून मान्यता घेण्यात येऊन जुलै-ऑगस्ट महिन्यात जाहिरात काढून रिक्त जागांवर अधिव्याख्यात्यांच्या नेमणुका करण्यासाठी रिक्त पदाचे रोस्टर उपलब्ध करून तपासून घेऊन त्याची मा. सहसंचालक यांचेकडून परवानगी घेण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>सूचक — प्रा. डॉ. एस. डी. मोरे<br>अनुमोदक — प्रा. लक्ष्मण [illegible] कांबळे. |
| | **ठराव क्र. ४.**<br>शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आलेल्या तक्रार विचार विनिमय करणे. | कोणत्याही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अर्ज आलेला नव्हता. |
| | **ठराव क्र. ५.**<br>मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांवर विचार विनिमय करणे. | आयत्यावेळी कोणताही विषय मा. अध्यक्षासमोर आला नाही त्यामुळे सर्व अध्यक्षांच्या परवानगीने सर्वांचे आभार मानून सभा संपविण्यात आली. |

प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती
[illegible] कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, [illegible] जि. [illegible]

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 173 ता. १०/११ /२०१९

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|

महाविद्यालय विकास समितीची बैठक नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ९७(१) अन्वये शै. वर्ष २०१९-२० मधील आज दि. १०-११-२०१९ रोजी सकाळी १० वाजता पाचोरा तालुका सह. शिक्षणसंस्थेने चालविलेल्या भडगाव येथील श्री. रजनीताई नानासाहेब देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगाव येथे मा. नानासो संजय ओंकार वाघ - चेअरमन यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली. सदर सभेस खालील प्रमाणे मान्यवरांनी उपस्थिती दिली.

१ मा. नानासो संजय ओंकार वाघ - अध्यक्ष
२ मा नानासो विकास त्र्यंबक वारी - सदस्य
३ मा आबासो दत्तात्रय माणिकराव पवार - सदस्य
४ मा. अण्णासो नानासाहेब ववनराव देशमुख - सदस्य
५ मा. बाबासो. विनय मधुकरराव जकातदार - सदस्य
६ श्री प्रा. डॉ. संजय देविदास भैसे - सदस्य
७ श्री. प्रा सुरेश रामराव पाटील - सदस्य
८ श्रीमती डॉ. चित्रा मुकुंद पाटील - सदस्य
९ श्री प्रा. डॉ दिपक मोतीराम मराठे सदस्य
१० श्री लक्ष्मण ज्ञानोबा कांबळे
११ श्री सुनिल रामभाऊ पाटील - (अध्यापकेतर सदस्य)
१२ श्री सभापती महाविद्यालय विद्यार्थी परिषद
१३ श्री सचिव महाविद्यालय विद्यार्थी परिषद
१४ प्राचार्य - डॉ. एन.एन. गायकवाड - सचिव

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा महाविद्यालय विकास समितीचे सचिव डॉ. एन. एन. गायकवाड यांनी सभेस उपस्थित मान्यवरांचे शब्दसुमनांनी स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात केली.

महाविद्यालयास नविन इमारतीत भेट वस्तु म्हणून देणारे पाचोरा येथील भारत डेअरीचे संचालक श्री. पुनमचंद बच्छराज परवारी यांनी विद्यार्थ्यांसाठी पाणी पिण्यासाठी वॉटरकुलर, तसेच प्रा. जी. एस. अहीरराव यांनी ट्युबलाईट व ६ पंखे व प्रा. श्रावण कोळी, प्रा. प्रदिप वाघ, प्रा. क्रांती सोनवणे, प्रा. मंजुश्री जाधव, प्रा. जे. जे. देवरे, प्रा. भुषण वानखेडे यांनी प्रत्येकी एक पंखा, तसेच प्रा. दिपक मराठे यांनी

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 174 | ता. १७/११/२०१९

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | |

यांनी मुलांसाठी तात्पुरती पत्र्याची मुतारी उभी करणेसाठी पाच हजार रुपये दिले अशा दात्यांचे महाविद्यालयाच्या परीवाराच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन संस्थेच्या वतीने करण्यात आले होते. त्याचप्रकारे महाविद्यालयातील प्राचार्य व काही प्राध्यापक बंधुभगिनी यांनी नविन इमारत उभी करणेसंदर्भात सढळ हस्ते ~~मदत~~ आर्थिक मदत दिली त्यांचेही अभिनंदन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

**विषय क्र. १.**
मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.

— महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची दि. १०-२-२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. ठराव सर्वानुमते मंजूर

सुचक - प्रा. एस. आर. पाटील,
अनुमोदक — मा. नानासो. डी. टी. जोशी.

**विषय क्र. 2**
आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या जमाखर्चास मंजूरी देणेबाबत..

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील जमाखर्चाचा लेखा परिक्षण अहवाल सभेपुढे सादर करण्यात आला अहवालासंबंधि सविस्तर चर्चा करण्यात आली.
१) लेखा परिक्षण अहवालातील महाविद्यालयाच्या आवारातील सायकल स्टँड संदर्भात अदा केलेल्या बिलातून राहून गेलेल्या टिडिएस कपात करुन घेण्याची सुचना तर्था मार्गदर्शन संस्थेचे व्हा. चेअरमन नानासो डी. टी. जोशी यांनी केले. तशी सुचना देखील संबंधित लिपिकास देण्यात आली. २) लेखा परिक्षण अहवालातील वीस नंबरच्या स्कान्या IQAC साठी युजीसीने पाठविलेल्या रु. २१०,३५७/- अधिक व्याज रु. ४०,२९५ व युजीसी. कोचिंग क्लासेसचे १,८५०० व त्यावरील व्याज रु. २४८४८/- या फंडाच्या कोणत्याही प्रकारच्या उपयोगात न आणता युजीसीला व्याजासह परत केलेला आहे. त्यामुळे महाविद्यालयाची बरीच कामे झाली असती असे मा. चेअरमनसो यांनी नाराजी व्यक्त केली व यापुढे असे होता कामा नये अशा स्पष्ट सुचना देण्यात आल्या. त्याचबरोबर नॅक तृतीय पुनः मुल्यांकनसाठी सादर करावयाच्या IQAR-5 सप्टेंबर २०१९ पर्यंत नॅक समिती बेंगलोर येथे पाठवावयाचा होता. परंतू महाविद्यालयाचे प्राचार्य व IQAC समन्वयक प्रा. कांबळे यांनी IQAR-5 जमा न होण्याचे कारण म्हणजे नविन बदललेल्या नियमावलीप्रमाणे आता IQAR-5 हा संकेतस्थळावर म्हणजे ऑनलाईन जमा करावयाचा

# प्रोसिडींग बुक

175

सभा नं.　　　　　　　　　　　　　　　　　ता.१८/११/२०१९

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | असल्यामुळे सदर बाबतीत लागणारे उच्चप्रतिचे स्कॅनर व प्रिंटर्स डेक्स्ट पी.सीसह आवश्यक असल्यामुळे तसेच याआधी पाठविलेले 1 ते 4 IQAR रिपोर्ट पुन्हा बदललेल्या नविन फॉर्मेटमध्ये सादर करावयाचे असल्यामुळे यासाठी लागणारे आधुनिक उपकरणे व आधीचे चारही अहवाल नविन प्रमाणे करून घेणेसाठी म्हणून वेळ व आधुनिक उपकरणे इ. तांत्रिकबाबींमुळे सदर काम घाई-घाईत करू नये व दुरुस्तीसाठी वेळ उपलब्ध होत असल्यास योग्य व परिपुर्ण स्वरूपात महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर सादर करणेसाठी अपेक्षित वेळ व उपकरणे मिळणेसाठीचे निवेदन सादर केले. सदर बाब सभेने मान्य केल्यामुळे महाविद्यालयाच्या विनंतीअनुसार सन्माननीय संस्थेने अपेक्षित उपकरणे ~~सभेने मान्य~~ ~~केल्यामुळे महाविद्यालयाच्या~~ देऊन देण्याचे मान्य केल्यामुळे मला केले. शक्य तितक्या लवकर सदर संगणक व प्रिंटर्स विकत घेण्याचे ठरले.<br>सुचक :- मा. नानासाहेब व्ही. टी. जोशी<br>अनुमोदक - प्रा. डॉ. एस. डी. भैसे. |
| | विषय क्र-3 -<br>आर्थिक वर्ष २०१९-२० या वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता घेणेबाबत... | आर्थिक वर्ष २०१९-२० या वर्षाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते विचार विनिमय करून मान्यता देण्यात आली<br>सुचक - प्रा. डा.ल.जी. कोबले.<br>अनुमोदक - प्रा. सुरेश रामराव पाटील. |
| | विषय क्र. ४ -<br>महाविद्यालयाच्या अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या कला वाणिज्य व विज्ञान या वर्गाच्या विविध विषयांच्या पा.ता.सह.शि.सं.ने पहील्या व दुसऱ्या सत्रासाठी (२०१९-२०) तासिका तत्वावरील नेमणूक केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीस विद्यापिठ परिनियम ४१५(3) | महाविद्यालयाच्या अनुदानित व विना अनुदानित तत्वावर सुरू असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गाच्या विविध विषयांच्या पा.ता.सह.शि.सं.ने पहील्या व दुसऱ्या सत्रासाठी (२०१९-२०) तासिका तत्वावर नेमणूक केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तिस विद्यापिठ परिनियम ४१५(3)नुसार मान्यता देणेबाबत विचार विनिमय करून खालील प्राध्यापकांना अधिव्याख्यात्यांना दि. ०१-०८-२०१९ ते दि. ३१-०३-२०२० पर्यंत मान्यता देण्याचे ठरले. |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 176 ता. १५/११/२०१९

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | नुसार मान्यता देणेबाबत विचार विनिमय करणे | अनुदानित तत्वावर —<br>रसायनशास्त्र — १) अनिल रामकृष्ण पाटील<br>२) सागर सुरेश पाटील.<br>हिंदी — १) श्रीमती. कांती वासुदेव सोनवणे<br>इतिहास — १) [illegible] मंजुश्री अप्पासाहेब जाधव<br>२) श्री प्रदिप भगवान वाघ<br>अर्थशास्त्र — १) श्री. जनार्दन जानजी देवरे<br>२) श्री गणेश गंभीरराव देशमुख.<br>कॉमर्स — १) श्री. भुषण कृष्णा वानखेडे<br>२) श्रीमती. सरोज रामेश्वर अग्रवाल.<br>विना अनुदानित तत्वावर —<br>कॉम्प्युटर सायन्स — १) श्री. अनिल पांडूरंग महाजन |
| | विषय क्रमांक - ५.<br>विद्यापिठाच्या स्थानिक चौकशी समितिने महाविद्यालयाच्या नविन इमारतीत इंटरनेट सुविधा नसल्याची अपुर्णता दाखविली आहे त्यासंबधी चर्चा करणे. | विद्यापिठाच्या स्थानिक चौकशी समितीने महाविद्यालयाच्या नविन इमारतीत इंटरनेट सुविधा नसल्याची अपुर्णता दाखविलेली असल्याचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी सभेसमोर निदर्शनास आणले यासंदर्भात बी. एस. एन. एल. सेवा देण्यास असमर्थ असल्याचे सांगितले त्यामुळे आपणास खाजगी कंपनीचे नेट घ्यावे लागेल असे प्रतिपादन केले. भविष्यात इंटरनेट अतिआवश्यकता असल्याचे व त्याचप्रमाणे नॅकसाठीही इंटरनेट आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले असता महोदयांनी बी. एस. एन. एल सेवा पुर्वत नसेल तर खाजगी कंपनीकडून इंटरनेटची व्यवस्था करावी असे सुचविले ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.<br>सुचक — प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड.<br>अनुमोदक - प्रा. डॉ. चित्रा सुकदेव पाटील. |
| | विषय क्र - ६<br>विजेचे वाढते दर व वापर लक्षात घेता महाविद्यालयात सोलर पॅनल बसविणेकामी विचार विनिमय करणे | सदर विषय तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. |

# प्रोसिडींग बुक

ता.१७/११/२०१९

सभा नं. 177

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | विषय क्र- ७<br>मानधन तत्वावर कार्यरत कर्मचारी यांचे मानधनाचा वार्षिक बोजा लक्षात घेता निधि निश्चीत उभारणे संदर्भात विचारविनिमय करणे | या विषयावर दि. २८-९-२०१९ च्या पत्रानुसार महाविद्यालयाचे आर्थिक परिस्थितीची जाणिव महाशय चेअरमनसाहेब यांना सविनय कळविण्यात आलेली आहे. महाविद्यालयाच्या खात्यात पैसे शिल्लक नसल्यामुळे मानधन तत्वावर नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर रक्कम पासून अदा करता येणार नसल्याचे प्राचार्यांनी सभेस निवेदन। |
| | विषय क्र. ८<br>महाविद्यालयाचे नॅकचे (तिसऱ्यांदा) पुर्नःमुल्यांकन करण्यासाठी झालेल्या कामाचा आढावा घेऊन जबाबदाऱ्या निश्चित करणेबाबत विचारविनिमय करणे | सदर विषय आला असता नॅकचे कोऑर्डीनेटर प्रा. अविनाश भंगाळे हे सभेस उपस्थित नव्हते. त्यामुळे सदर विषयावर चर्चा होऊ शकली नाही. तसेच सदस्यांनी प्रा. भंगाळे यांना पत्र देऊन यासंदर्भ खुलासा मागविण्याचे सांगितले.<br>सुचक – प्रा. डॉ. एस. डी. भैसे<br>अनुमोदक – प्रा. डॉ. डि. एम. मराठे. |
| | विषय क्र. ९.<br>सप्टेंबर अखेर महाविद्यालयाचे राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायण ची मुदत (२०१४-१५ ते २०१८-१९) संपुष्टात येत आहे. नविन मुल्यांकन करुन घेणे व त्यावर एकुण खर्चावर चर्चा करणे | सदर विषय तुर्त स्थगित ठेवण्यात आला. |
| | विषय क्र.-१०.<br>महाविद्यालयाच्या व्हॅल्यूॲडेड/ डेव्हलपमेंट कोर्सेस सुरु करणे संदर्भात चर्चा करुन सदर जबाबदारी प्रस्तावासकट निश्चित करणे व अपेक्षित खर्च, मनुष्यबळ, अभ्यासिका खोल्या, पुरेसे संगणक, संगणकशिक्षक इ.बाबत विचार विनिमय करणे. | प्रा. डी. एच. लांडगे यांनी महाविद्यालयात सदर कोर्स सुरु करणेसंदर्भात मान्यवरांना माहीती दिली असता सदर व्हॅल्यु ॲडेड/डेव्हलपमेंट कोर्सेस बाबत अपेक्षित खर्च, मनुष्यबळ, अभ्यासिका खोल्या, पुरेसे संगणक, संगणकशिक्षक इ.साठी लागणारा खर्चाचा अहवाल प्राचार्य यांना सादर करावा. तद्नंतर योग्य तो निर्णय घेण्यात येईल. असे ठरले.<br>सुचक – प्रा. डाॅ. जी. कोळंबे.<br>अनुमोदक – प्रा. डॉ. एस. डी. भैसे. |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 178 ता. १० /११ /२०१९

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | विषय क्र. ११<br>युजीसी अखर्चित निधी संदर्भात चर्चा करणे व अखर्चित निधि संदर्भात जबाबदाया निश्चित करणे | युजीसी अखर्चित निधी संदर्भात जबाबदाया निश्चित करणे या संदर्भात प्राचार्य व प्रा. कांबळे यांनी विविध मुद्दे मांडले परंतु त्या मुद्द्यात महोदयांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी या संदर्भात स्वतंत्र अहवाल संस्था कार्यालयात देण्याचे आदेश दिले.<br>सुचक – प्रा. डॉ. चित्रा सु. पाटील.<br>अनुमोदक – प्रा. डॉ. दिपक मो. मराठे. |
| | विषय क्र – १२.<br>शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आलेल्या अर्जावर विचारविनिमय करणे | शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळ्या विषयावर आलेल्या अर्जावर खालील प्रमाणे विचार विनिमय करण्यात आला.<br>१) दिलीप नथू चौधरी (प्रयोगशाळा परिचर)<br>विषय – आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणेबाबत –<br>निर्णय – शासनाने सदर योजना बंद केलेली आहे. भविष्यात पुन्हा सुरु झाल्यास प्रकरण पाठवावे.<br>२) प्रा. डॉ. एस. डी. भैसे (भुगोल विभाग प्रमुख).<br>विषय – १) ५० बाकांची खरेदी करणे<br>निर्णय – ५० बाकांची खरेदी करणेबाबत संबंधित कोटेशन मागविणेत यावे व कमी किंमतील नोंदवलेल्या निविदाधारकास ऑर्डर देण्याचे अधिकार सदर सभेने प्राचार्य यांना देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>विषय – २) स्टाफ रुममध्ये बैठक व्यवस्थाबाबत.<br>निर्णय – स्टाफरुममध्ये बैठक व्यवस्था करणेसाठी तुर्त ११ फायबर खुर्च्या नविन खरेदी करण्यात आल्या आहेत नविन इमारतीच्या प्राध्यापक दालनात फर्निचर काम बाकी आहे निधी उपलब्ध होताच दोनही इमारतीच्या प्राध्यापक दालनात समेक्षा सोयी व फर्निचर करण्यात येतील.<br>विषय – ३ मुलींसाठी स्वतंत्र मुतारीची व्यवस्था करणे<br>निर्णय<br>मुलींसाठी तात्पुरती पत्र्यांची मुतारी उभी करण्यात आली आहे शासनाच्या प्रचलित नियमानुसार सुलभशौचालय लवकरच करण्यात येईल. |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 179 ता. १६ / ११ / २०१८

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | विषय-४. दिवस व रात्र - महाविद्यालयात दोन सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करणे व त्यांचे मानधन ठरविणेबाबत..<br>निर्णय — महाविद्यालयात दिवस-रात्र दोन सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे प्रत्येकी ४०००/-रु मानधन देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले<br>३) प्रा. डस. आर. पाटील — उपप्राचार्य व रसायनशास्त्र विभागप्रमुख<br>विषय-१ — विद्यापिठाच्यावतीने दर तीन वर्षांनी अभ्यासक्रम बदलत असतो त्यासाठी नवीन उपकरणे प्रयोगशाळेत लागतात त्याची खरेदी करण्यास परवानगी मिळणेबाबत-<br>निर्णय — नविन अभ्यासक्रमासाठी वेगवेगळी उपकरणे नविन खरेदी करण्यास परवानगी देण्यात आली.<br>विषय-२. जुन्या इमारतीच्या ७ खोल्यांचा स्लॅब जास्त पाऊस झाल्यामुळे गळत आहे. त्यासाठी फिनिशिंग करणे. नविन रंगकाम आतुन व बाहेरुन करणे आवश्यक आहे<br>निर्णय — सदरील विषयाच्या संदर्भात लागणाऱ्या खर्चाचे कोटेशन घेऊन कमी दरात ज्याचे कोटेशन असेल त्यास प्राचार्यामार्फत संस्था कार्यालयात सादर करावे व योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.<br>४) विषय — स्थावर जंगम मालमत्ता समितीचे प्रमुख - उपप्राचार्य प्रा. डस. आर. पाटील यांनी महाविद्यालयाच्या नविन जागेचा शेतसारा भरणेबाबत तलाठी-तेगगाव ता. कन्नड जि. जळगाव यांच्याकडून दि. २२-५-२०१८ पावेतो १,२६,०००/ रक्कम भरावी अशा प्रकारची नोटीस संस्थेच्या नावाने आलेली आहे. असे निदर्शनास आणून दिले.<br>निर्णय - सदर शेतसारा भरणेबाबत तलाठी तेगगाव ता. मेडगाव यांना आलेल्या नोटीशीचे उत्तर देणेसाठी मा. नानासो व्ही. टी. जोशी यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करावी |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 180

ता. १८ / ११ / २०१९

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | <u>विषय क्र - १३</u><br>अभिनंदनाचा ठराव पास करणेबाबत.. | महाविद्यालयाच्या नविन इमारतीत बऱ्याच सोयींची अपुर्णता आहे. त्यासाठी खालील विविध कर्मचाऱ्यांनी आपापल्यापरीने काहीनाकाही दैनंदीन उपयोगाच्या वस्तु महाविद्यालयात सप्रेम भेट दिल्या त्यांचा अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. त्यांची नावे व त्यांनी दिलेल्या वस्तु खालीलप्रमाणे आहेत. |

| नाव | भेट दिलेली वस्तु |
|---|---|
| १) श्री पुनमचंद कच्छराज पटवारी | विद्यार्थ्यांना पाणी पिण्यासाठी वॉटरकुलर |
| २) -"- श्रावण कोळी | १ पंखा |
| ३) -"- प्रदिप वाघ | -"- |
| ४) -"- कांती सोनवणे | -"- |
| ५) -"- मंजुश्री जाधव | -"- |
| ६) -"- जे.जे. देवरे | -"- |
| ७) -"- भुषण वानखेडे | -"- |
| ८ -"- जी. एस. अहिरराव | ट्युबलाईट व ६ पंखे |
| ९ -"- डॉ. डि. एम. मराठे | मुलांसाठी तात्पुरती फर्यांची मुतारी साठी ५०००/- रु. दिले |

तसेच याआधी ज्यांनी बांधकामासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य व काही प्राध्यापक यांनी सढळ हस्ते मदत केली त्यांचेही अभिनंदन संस्थेच्यावतीने करण्यात आले.

सुचक - प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड.

अनुमोदक - उपप्राचार्य - प्रा. एस. आर. पाटील

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | <u>विषय क्र - १४</u><br>महाविद्यालयाच्या नविन इमारतील बांधकामामध्ये मंजूर इस्टीमेटमध्ये काही बाबींचा उल्लेख राहून गेलेला होता. सदरबाब महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी मा. व्यवस्थापनास विनंती करुन सविनय सादर केले असे प्राचार्य दालनातील अॅटॅच टॉयलेट युनिट, प्राचार्य दालनातील पि.ओ.पी., पि.ओ.पी.मधील स्पॉट लाईट इलेक्ट्रीक फिटींग | |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 181

ता. १७/११/२०१९

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | संपुर्ण इमारतीमधील मेन इलेक्ट्रिक फिटींग, प्रत्येक वर्ग खोल्यांमधील इलेक्ट्रिक वायरींग फिटींग, इलेक्ट्रिक फिटींग मजुरी, ध्वजवंदन ओटा व त्यावरील पोल, स्टेअरकेसवर स्लॅब टाकुन दोन, एक नविन सेफटीक टॅक जास्तीचे बनविणे. संपुर्ण इमारतीच्या कामात झालेल्या मापातील फरक, दोघे स्टेअरकेसच्या खाली रुम तयार करणे व प्लंबिंग कामामधील काही बदल इ. बाबत विचारविनिमय करणे व जास्तीच्या कामास व खर्चास मान्यता देणेबाबत.. | सदर विषयाच्या बाबत वास्तुविशारद मा. अविनाश सोनी, जळगाव यांच्याकडून प्राप्त झालेल्या कामांच्या मोजमाप अहवालानुसार सदर जादा झालेल्या कामांच्या खर्चास साधकबाधक चर्चा करुन सदर खर्च मंजूर करण्यात आला. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.<br>सुचक - प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड.<br>अनुमोदक - नानासो व्ही. टी. जोशी. |
| | विषय क्र- १५<br>मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयाचा विचार करुन निर्णय घेणे | ठराव -<br>महाविद्यालयाचे शासनाच्या नविन धोरणानुसार पगाराचे अनुदानाच्या रकमा व खर्च बँक ऑफ महाराष्ट्र, पाचोरा बचत खाते व्यतिरिक्त करंट खाते (चालु खाते) नव्याने उघडणेबाबत -<br>निर्णय - ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या नविन धोरणानुसार मा. सहसंचालक उ. शि. अ. जळगाव यांचे पत्र क्र - सलेअ/लेखा/बँक खाते क्र. माहीती/2019-20/3571/2019 दि 26-12-2019 नुसार अनुदानित अशासकिय महाविद्यालयाचे जे पगाराचे खाते बचत खात्यामध्ये आहे त्याबाबत खात्याच्या व्यतिरिक्त पगारासाठी बँक ऑफ महाराष्ट्र शाखा पाचोरा येथे आपल्या महाविद्यालयाचे (Current A/C) चालु खाते प्राचार्य, सौ. र. ना. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगाव या नावाने उघडावे व ते ऑपरेट करण्याचे अधिकार एकेरी सहीने प्राचार्य यांनाच असतील. ठराव सर्वानुमते मंजूर<br>सुचक - प्रा. एल. जी. कांबळे<br>अनुमोदक - प्रा. डॉ. एस. डी. भैसे. |

प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती
सौ.र.ना.दे. कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, भडगाव जि. जळगाव

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 182

ता. २० /१ /२०२१

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची बैठक नविन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६च्या कलम ९७(१) अन्वये शै. वर्ष २०२०-२१ मधील सभा आज दि. २०-१-२०२१ रोजी ठिक १०=३० वाजता पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था पाचोराने चालविलेल्या भडगाव येथे प्राचार्य यांचे दालनात ~~संपन्न झाली~~ मा. चेअरमनसो नानासो संजय ओंकारवाघ यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. | |
| | सदर सभेस खालील मान्यवर उपस्थित होते. | |
| १ | श्री. मा. नानासो संजय ओंकार वाघ. – अध्यक्ष. | |
| २ | श्री. मा. नानासो. विलास त्र्यंबक जोशी – सदस्य (शिक्षण क्षेत्र) | |
| ३ | श्री. मा. आबासो दत्तात्रय माणिकराव पवार – सदस्य (उद्योग क्षेत्र) | |
| ४ | श्री. मा. आण्णासो नानासाहेब बबनराव देशमुख – सदस्य (संशोधन क्षेत्र) | |
| ५ | श्री. मा. बाबासो विनय मधुकर जकातदार – सदस्य (समाजसेवा क्षेत्र) | |
| ६ | श्री. प्रा. डॉ. एस. डी. भैसे (प्राचार्य किंवा परिसंस्था प्रमुखाद्वारे नामनिर्देशित विभागप्रमुख) | |
| ७ | श्री. प्रा. सुरेश रामराव पाटील – सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) | |
| ८ | श्रीमती. प्रा. डॉ. चित्रा सुकदेव पाटील – सदस्य (अध्यापक महीला प्रतिनिधी) | |
| ९ | श्री. प्रा. डॉ. दिपक मोतीराम मराठे – सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) | |
| १० | श्री. प्रा. लक्ष्मण ग्यानोबा कांबळे – सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) समन्वयक – महाविद्यालयअंतर्गत गुणवत्ता समिती | |
| ११ | श्री. सुनिल रामभाऊ पाटील – अध्यापकेतर सदस्य. | |
| १२ | श्री. सभापती, महाविद्यालय विद्यार्थी परिषद | |
| १३ | श्री. सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद | |
| १४ | श्री. प्राचार्य डॉ. नाना नामदेव गायकवाड – सदस्य सचिव. | |
| | प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीचे सचिव डॉ. एन. एन. गायकवाड यांनी सभेस उपस्थित मान्यवरांचे शब्दसुमनांनी स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात केली. | |
| * | विषय क्र. १. | |
| | मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची मागील सभा दि. १७-११-२०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करण्यात आले. |
| | | सुचक – मा. नानासो. व्ही. टी. जोशी. |
| | | अनुमोदक – मा. आण्णासो नानासाहेब देशमुख. |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 183

ता. २० / ७ / २०२१

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| * | विषय क्र. २. आर्थिक वर्ष २०१९-२० च्या वार्षिक जमाखर्चास मंजूरी देणेबाबत. | महाविद्यालयातील सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा हिशोब मा. प्राचार्यसो यांनी सविस्तरपणे वाचून दाखविला त्यावर मा. नानासो बी.टी. जोशी यांनी काही मुद्द्यांवर चर्चा केली व काही सूचनाही केल्या त्या सूचनांचा विचार करुन जमाखर्चास मान्यता देण्यात आली.<br>सूचक - प्रा. डॉ. एस.डी. भैसे<br>अनुमोदक - मा. आबासो स्वामय माणिकराव पवार. |
| * | विषय क्र. ३. आर्थिक वर्ष २०२०-२१ या वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणेबाबत. | आर्थिक वर्ष २०२०-२१च्या अंदाजपत्रक सभेपुढे वाचून दाखविण्यात आला. त्यावर सभेपुढे चर्चा होऊन अंदाजपत्रकास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>सूचक - प्रा. एस.आर. पाटील.<br>अनुमोदक - मा. नानासो बी.टी. जोशी. |
| * | विषय क्र. ४ NAAC (3rd cycle) साठी आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेणे व तृतीय पुनर्मूल्यांकनासाठी सर्वांची तयारी करणेबाबत विचार विनिमय करणे. | नॅकच्या (3rd cycle) साठी आतापर्यंत झालेल्या सर्व कामकाजासंदर्भात नॅक समन्वयक प्रा. ए.एन. भंगाळे यांनी माहिती सादर केली. सदर बाबतीत मागील संपुर्ण पाच वर्षांचा आढावा घेऊन नॅकसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींच्या पुर्ततेसाठी विचारविनिमय करण्यात आला. मागील काही वर्षांचे IQAR हे बेंगलोर नॅक वेबसाईटवर अपलोड देखील करण्यात आले. यासंदर्भात नॅक बेंगलोरकडून प्राप्त होणाऱ्या विविध परिपत्रकांचे अवलोकन करुन योग्य ती कार्यवाही करावी. नॅक तृतीय पुनर्मुल्यांकन करुन घेण्याचे सर्वानुमते ठरले. सदर तृतीय पुनःमुल्यांकनासाठी आवश्यक सर्वसिद्धी वेळोवेळी चर्चा करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>सूचक - प्रा. एल.जी. कांबळे<br>अनुमोदक - प्रा. डॉ. डि.एम. मराठे. |
| * | विषय क्र. ५ महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर प्रा. डॉ. डि.एच. तांदळे (क्रिडा शिक्षक) यांनी स्वखर्चाने बांधून घ्यायच्या क्रिडाशिल्प उभारणीच्या त्यांना | महाविद्यालयाचे क्रिडासंचालक तांदळे डि.एच. यांनी महाविद्यालयास दि. ०८-१०-२०२० रोजी पत्र देऊन महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वखर्चाने देखणे असे क्रिडाशिल्प उभारुन देण्याची विनंती केली होती. सदर क्रिडाशिल्पसाठी लागणारा एकूण सर्व हा. |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 18 ता. २० / १ / २०२१

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | दि. ०६-१०-२०२०च्या अर्जानुसार क्रिडा शिल्प उभारण्यास परवानगी देणेबाबत | त्यांनी स्वतः करावयाचा असल्याने सर्वानुमते क्रिडाशिल्प उभारण्यास अत्यंत उत्साहपुर्ण वातावरणात अनुमती देण्यात आली या शिल्प उभारणीबद्दल प्रा. तांदळे डि.एच. तसेच परीवाराचे या निमित्ताने आभार व्यक्त करून अभिनंदनाचा ठराव करण्यात आला<br>सुचक — प्रा. डॉ. सी. एस. पाटील<br>अनुमोदक - प्रा. डॉ. एस. डी. भैसे. |
| * | विषय क्र. ६<br>सामाजिक कार्यकर्ता भाऊसो श्री संतोष जाधव यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वखर्चाने बांधून द्यावयाच्या Ground Service Reservior (GSR) जलकुंभ उभारणीच्या त्यांच्या दि. / /२०२०च्या अर्जा-नुसार जलकुंभ उभारण्यास परवानगी देणेबाबत तसेच राष्ट्रपुरूषांच्या तसबीरी भेट स्विकारणेबाबत. | सामाजिक कार्यकर्ता भाऊसाहेब श्री संतोष जाधव-भडगाव यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वखर्चाने बांधून द्यावयाच्या Ground Service Reservior (GSR) या जलकुंभ उभारणीच्या त्यांच्या लेखी पत्रास जलकुंभ उभारणीसाठी अत्यंत उत्साहाच्या वातावरणात अनुमती देण्यात आली याप्रसंगी भाऊसो संतोष जाधव यांनी जलकुंभ उभारणेसाठीचा त्यांचा अभिनंदनाचा ठराव पास करण्यात आला. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य दालनात राष्ट्रपुरुषांच्या तसबीरी भेट म्हणून देण्याचा त्यांचा मानस त्यांनी व्यक्त केला असल्यामुळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एन. गायकवाड यांनी त्या तसबीरींचा स्विकार करावा असे सर्वानुमते ठरले याप्रित्यर्थ देखील श्री. संतोष जाधव यांचे आभार मानून अभिनंदनाचा ठराव करण्यात आला<br>सुचक — प्रा. एल.जी. कांबळे.<br>अनुमोदक — सुनिल रामभाऊ पाटील. |
| * | विषय क्र. ७.<br>महाविद्यालयास सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या आर्थिक वर्षात देय असलेल्या बिलांबाबत व अनामत रकमांबाबत विचार-विनिमय करणे | सदर बाबतीत असे ठरले की, मागील काही वर्षाचे देणे बाकी तसेच अनामत रकमा अदायगी संदर्भात विचारविनिमय करून असे ठरले की महाविद्यालयास प्राप्त होणाऱ्या स्वअधिकारातील रकमांमधून मा. संस्थेशी विचारविनिमय करून बिलांच्या रकमा व अनामती अदा कराव्यात<br>सुचक — प्रा. एस. आर. पाटील.<br>अनुमोदक — प्रा. डॉ. एस.डी. भैसे. |
| * | विषय क्र. ८<br>महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या विभागप्रमुखांकडून आलेल्या मागण्या, उपकरणे, रसायने, फर्निचर | सदर विषयानुसार विविध विभागाच्या विभागप्रमुख यांच्याकडून मागण्या उपकरणे, रसायने, फर्निचर क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ इ. खरेदी संदर्भात निविदा |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 185 ता. २०/७/२०२१.

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | क्रमिक पुस्तके, संदर्भीय ग्रंथ इ. खरेदी निविदा मागवून खरेदीचे अधिकार प्राचार्यांना देणेबाबत विचारविनिमय करणे. | मागवून तुलनात्मक विचार करुन कार्योत्तर मंजूरी घेऊन प्राचार्यांनी आवश्यक ती खरेदी करावी असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक – प्रा. डॉ. सी. एस. पाटील.<br>अनुमोदक – प्रा. डॉ. डि. एम. मराठे. |
| * | विषय क्र. ९<br>महाविद्यालयातील २०१९-२०च्या कार्यभारानुसार रिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे पुर्णवेळ तथा घड्याळी तासिका तत्वावर भरण्यासंबंधी विचार विनिमय करणे.<br>प्रा. डॉ. कांती वासुदेव सोनवणे<br>प्रा. जनार्दन नानजी देवरे | सदर विषयासंदर्भात महाशय सहसंचालक उशिअ जळगाव विभाग जळगाव यांनी उपलब्ध कार्यभाराच्या निकषानुसार तपासून दिलेल्या कार्यभारानुसार महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे विद्यापिठ परिनियम ४१५(१) अनुसार भरण्याचे ठरले याकामी शासनाकडून होणाऱ्या विलंबापोटी विद्यापिठ परिनियम ४१५(३) अनुसार घड्याळी तासिका तत्वावर सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासंदर्भात देखील विचारविनिमय करण्यात आला व भरलेल्या पदांना मान्यता देऊन प्रस्ताव मान्यतेसाठी विद्यापिठाकडे पाठविण्याचे सर्वानुमते ठरले.<br>सुचक – प्रा. डॉ. किरण एस. पाटील.<br>अनुमोदक – प्रा. डॉ. डि. एम. मराठे. |
| * | विषय क्र. १०<br>महाविद्यालयासाठी आयएसओ मानांकन मिळविण्यासाठी विचार विनिमय करणे | नॅक तृतीय पुनःमुल्यांकन करुन घेणेकामी महाविद्यालय हे आय एस ओ मानांकन प्राप्त असणे आवश्यक असते. त्यामुळे महाविद्यालयाने सदर मानांकन करुन घेणेसाठी सभेने एकमुखी अनुमती दिली तसेच यासाठी होणारा खर्च देखील मान्य करुन महाविद्यालयातील एका अनुभवी प्राध्यापकाला या कामासाठी नियुक्त करण्याचे अधिकार महाविद्यालयाचे प्राचार्यांकडे देण्यात आले<br>सुचक – मा. नानासो डी. टी. जोशी<br>अनुमोदक – प्रा. एल. जी. कांबळे. |
| * | विषय क्र. ११<br>महाविद्यालय गुणवत्ता सुधार समितीच्यानुसार वाणिज्य शाखेत डाटासायन्स शॉर्टटर्म कोर्सेस सुरु करण्यासंदर्भात पुणे येथील आलेल्या संस्थेच्या प्रस्तावर विचारविनिमय करणे | महाविद्यालयाची गुणवत्ता वाढीस लागण्याच्या दृष्टीकोनातून कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखेव्यतिरिक्त महाविद्यालयाच्या तृतीय पुनःमुल्यांकनासाठी पुरक ठरावे म्हणून काही विभाग व विषयांमध्ये शॉर्टटर्म कोर्सेस तसेच सर्टिफिकेट कोर्सेस सुरु करण्यासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>सुचक – प्रा. एस. आर. पाटील.<br>अनुमोदक – प्रा. डॉ. सी. एस. पाटील |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 18 ता. २०/१/२०२१

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| * | विषय क्र. १२. | |
| | सातव्या वेतन आयोगानुसार Academic Research Score (ARS) अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या प्रा.डॉ. चित्रा पाटील प्रा. देवेंद्र मस्की, प्रा.डॉ. अतुल देशमुख, प्रा.डॉ. सचिन हडोळतीकर, प्रा.डॉ. बाळू भालेराव यांच्या प्राप्त अर्जावर मान्यता देणेबाबत | सदर विषयाच्या संदर्भात सातव्या वेतन आयोगानुसार ARS अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या प्राध्यापकांच्या प्राप्त अर्जावर गुणवत्ता सुधार समिती समन्वयक प्रा. एल.जी. कांबळे यांनी सविस्तर माहिती सादर केली व सदर प्राप्त अर्जानुसार पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या प्राध्यापकांना पात्र असल्यामुळे मान्यतेस्तव विनंती सादर केली योग्य त्याबाबी तपासून घेतल्यानंतर साधकबाधक चर्चेअंती उपरोक्त सर्व प्राध्यापकांना पदोन्नतीसाठी पात्र असल्याची मान्यता देण्यात आली. |
| | | सुचक — मा. आण्णासाहेब नानासाहेब बकराव देशमुख |
| | | अनुमोदक — प्रा.डॉ. डि.एम. मराठे |
| * | विषय क्र. १३. | |
| | महाविद्यालयातील वर्ग ४ मधून वर्ग ३ मध्ये पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीबाबत विचारविनिमय करणे. | महाविद्यालयातील वर्ग ४ मधून वर्ग ३ मध्ये पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यासंदर्भात महाविद्यालयातील प्रयोगशाळा परिचर श्री अजय संभाजीराव देशमुख हे अर्थार्थी पात्र असल्यामुळे व त्यांचे संगणक ज्ञानावर चांगली पकड असल्यामुळे प्रचलित सेवाशर्ती नियमांचे अवलोकन करून साधकबाधक चर्चेअंती श्री अजय देशमुख यांची वर्ग ३ मध्ये पदोन्नती द्यावी असे सर्वानुमते ठरले. |
| | | सुचक — प्रा. एल.जी. कांबळे |
| | | अनुमोदक — श्री सुनिल रामकाळ पाटील. |
| | विषय क्र. १४ | |
| | राज्यातील नामांकित चॅरीटेबल संस्थांकडून मिळणारे अनुदानासाठी विचारविनिमय करणे. | सदर विषयानुसार असे ठरले की सध्या विद्यापिठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचेकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे व अनुदान प्राप्त न झाल्यामुळे महाविद्यालयाचा विकास खुंटीत राहू नये म्हणून समाजातील दानशूर व्यक्ती मान्यवर नामांकीत चॅरीटेबल संस्था यांचेकडून काही अनुदान मिळेल का? या दृष्टीने देखील प्रयत्न करण्याचे ठरले |
| | | सुचक — प्रा. एस. आर. पाटील |
| | | अनुमोदक — प्रा.डॉ. एस.डी. मैंदे |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 187

ता. २०/१ /२०२१.

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| * | विषय क्र - १५<br>शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आलेल्या अर्जावर विचारविनिमय करणे | सदर विषयासंदर्भात विषय क्र. १२ व १३ अनुसार विचार विनिमय करण्यात आलेला आहे.<br>सुचक — प्रा. डॉ. डि. एम. मराठे.<br>अनुमोदक - प्रा. डॉ. चित्रा एस. पाटील. |
| * | विषय क्र. १६<br>मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयासंबंधी विचारविनिमय करणे. | सदरहू आयत्यावेळी कोणताही विषय उपस्थित न झाल्यामुळे मा. अध्यक्ष महोदय यांच्या अनुमतीने खेळीमेळीच्या वातावरणात सदर सभा संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदर सभा संपन्न झाल्याचे जाहिर केले.<br>सुचक — प्रा. डॉ. एस. डी. भैसे<br>अनुमोदक — प्रा. डॉ. डि. एम. मराठे |

(signature)

प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती
सौ. र. ना. दे. कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, भडगांव जि. जळगाव

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 190 ता. १० /११ /२०२१.

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|

महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची सभा २०२१-२२.

महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची सभा नविन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापिठ अधिनियम २०१६ च्या कलम ९७(१) अन्वये शै.व. २०२१-२२ मधील. सभा आज दि. १०-११-२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता पाचोरा तालुका सह. शिक्षण संस्थेने चालविलेल्या भडगाव येथील कै. सौ. र. ना. देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगाव येथे संस्थेचे चेअरमन मा. नानासाहेब संजय ओंकार वाघ यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर सभेस खालील प्रमाणे मान्यवर उपस्थित होते-

१ श्री. मा. नानासाहेब संजय ओंकार वाघ - अध्यक्ष.
२ श्री. मा. नानासाहेब विलास त्र्यंबक जोशी - सदस्य (शिक्षण क्षेत्र)
३ श्री. मा. आबासो दत्तात्रय माणिकराव पवार - सदस्य (उद्योग क्षेत्र)
४ श्री. मा. आण्णासो नानासाहेब बळवंतराव देशमुख - सदस्य (संशोधन क्षेत्र)
५ श्री. मा. बाबासो विनय मधुकर जकातदार - सदस्य (समाजसेवा क्षेत्र)
६ श्री. प्रा. डॉ. एस. डी. भैसे (प्राचार्य किंवा परिसंस्था प्रमुखाद्वारे नामनिर्देशित विभागप्रमुख)
७ श्री. प्रा. सुरेश रामराव पाटील - सदस्य (अध्यापक प्रतिनिधी)
८ श्रीमती प्रा. डॉ. किर्ती सुकदेव पाटील - सदस्य (अध्यापक महीला प्रतिनिधी)
९ श्री. प्रा. डॉ. दीपक मोतीराम मराठे - सदस्य (अध्यापक प्रतिनिधी)
१० श्री. प्रा. लक्ष्मण ज्ञानोबा कांबळे - सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) समन्वयक - महाविद्यालयअंतर्गत गुणवत्ता समिती.
११ श्री. सुनिल रामभाऊ पाटील - अध्यापकेत्तर सदस्य
१२ श्री सभापती महाविद्यालय विद्यार्थी परिषद
१३ श्री सचिव महाविद्यालय विद्यार्थी परिषद.
१४ श्री. प्राचार्य डॉ. नाना नामदेव गायकवाड - सदस्य सचिव.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीचे सचिव ~~तथा प्राचार्य~~ प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी सभेस उपस्थित मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात केली.

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 191 ता. १० /११ /२०२१.

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | विषय क्र.१ - मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची मागील सभा दि. २०-१-२०२१ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. सुचक - मा. आबासो दत्तात्रय माणिकराव पवार अनुमोदक - प्रा. एस.जी. कांबळे |
| | विषय क्र.२, आर्थिक वर्ष २०२०-२१ या वर्षाच्या जमाखर्चास मंजुरी देणेबाबत.. | महाविद्यालयातील सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा जमाखर्चाचा हिशोब महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एन. गायकवाड यांनी सविस्तरपणे वाचून दाखविला त्यावर सविस्तरपणे चर्चा करण्यात आली. त्यावर संस्थेचे व्हा. चेअरमन मा. नानासो व्ही.टी. जोशी यांनी काही मुद्द्यांवर चर्चा केली व मार्गदर्शक सुचनाही केल्या त्या सगळ्यांच्या सुचनांचा विचार करुन जमाखर्चास मान्यता देण्यात आली. सुचक - मा. बाबासो विनय मधुकर जकातदार अनुमोदक - प्रा. एस. आर. पाटील. |
| | विषय क्र. ३. आर्थिक वर्ष २०२१-२२च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणेबाबत.. | आर्थिक वर्ष २०२१-२२चे अंदाजपत्रक महाविद्यालयाचे प्राचार्य तथा महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीचे सदस्य सचिव डॉ. एन.एन. गायकवाड यांनी सभेपुढे वाचून दाखविले सदर अंदाजपत्रकात विविध शिर्षकाखाली अंदाजे ५,१६,८२,८००/- अंदाजे खर्च येईल यावर सविस्तर चर्चा होऊन सदर अंदाजपत्रकास सभेने एकमताने मंजूरी दिली. सुचक - प्रा. डॉ. डि. एम. मराठे अनुमोदक - प्रा. डॉ. सी. एस. पाटील |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 192 ता. १० / ११ / २०२१

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | विषय क्र. ४<br>नॅक (3rd cycle) साठी आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेणे व तृतीय मुल्यांकनासाठी खर्चाची तरतुद करणे बाबत. | सदर विषयाच्या संदर्भात नॅक 3rd cycle चे समन्वयक प्रा. ए. एन. भंगाळे यांनी १ ते ७ क्रायटेरीया संदर्भात संपुर्ण माहीती सादर केली तसेच गुणवत्ता सुधार समितीचे समन्वयक प्रा. एल. जी. कांबळे यांनी आतापर्यंतच्या IQAR सन २०१५-१६ ते २०२०-२१ हा यशस्वीपणे नॅक पुर्नः मुल्यांकन समिती बंगलोर यांच्या कार्यालयाच्या वेबसाईटवर लवकरात लवकर अपलोड करण्यात येईल असे प्रगतीचा आढावा समितीसमोर सादर केला त्यासोबतच LOI (Letter of Intention) पासून ते पुढील तृतीय मुल्यांकनासाठीच्या सर्व स्तरांवर समिती प्रमुखांनी सुचविल्याअंती अंदाजे ६,५०,०००/- पर्यंतचा खर्च अपेक्षीत असल्याचे समितीसमोर सादर केला.<br><br>सुचक – प्रा. एल. जी. कांबळे. · अनुमोदक – प्रा. एस. आर. पावडे |
| | विषय क्र. ५<br>महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या विभाग प्रमुखांकडून तसेच नॅक समन्वयक / क्रायटेरीया चेअरमन यांच्याकडून आलेल्या मागण्या, उपकरणे, रसायने, फर्निचर, क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ इ. च्या खरेदीबाबत विचारविनिमय करणे | महाविद्यालयाच्या गुणवत्ता सुधार समितीच्या विविध बैठकांच्या चर्चेवेळी तसेच क्रायटेरीया १ ते ७ पर्यंतच्या विविधवेळी आयोजित केलेल्या बैठकांमध्ये तसेच महाविद्यालयाच्या प्रशासन समितीत व मा. प्राचार्य यांनी आयोजित केलेल्या विविध प्रकारच्या बैठकांमध्ये विविध विभागांचे विभाग प्रमुख व सदस्य यांनी लेखी/तोंडी मागणी केल्यानुसार महाविद्यालयाकडे सदर शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या निधी अंतर्गतच विविध प्रकारच्या खरेद्या निविदा मागवून तुलनात्मक पद्धतीने विभाग अंतर्गतच खरेदी करावे सर्व प्रकारच्या खरेदीचे अधिकार प्राचार्यांच्या निदर्शनात व्हाव्या असे ठरले. |

सुचक – प्रा. डॉ. एस. डी. भैसे

अनुमोदक – प्रा. डॉ. डि. एम. मराठे

सभा नं. 193

# प्रोसिडींग बुक

ता. १०/११/२०२१.

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | विषय क्र. ६<br>म. सहसंचालक कार्यालयाने दि ०१-१०-२०१७च्या विद्यार्थी संख्येवर आधारीत प्राध्यापक मान्यतेनुसार रिक्त पदांसाठी सन २०२०-२१ मध्ये घड्याळी तासिकांवर केलेल्या नियुक्त्यांना कार्योत्तर मान्यता घेणे व सन २०२१-२२ करीता मुलाखती घेऊन घड्याळी तासिकांवर नियुक्त केलेल्या प्राध्यापकांच्या नियुक्त्यांना मान्यता देणे व २०१९-२० च्या उपलब्ध कार्यभारानुसार रिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पुर्णवेळ तसेच घड्याळी तासिका तत्वावर आवश्यकतेनुसार पदे भरणेबाबत विचार विनिमय करणे. | सदर नियुक्त्या संदर्भात मा. व्यवस्थापन यांना विनंती करुन दि २५-९-२०२१ रोजी संस्था स्तरावर घेण्यात आलेल्या तासिका तत्वावरील नियुक्त्यांना मान्यता देण्यात आली या निवड झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांना ४१५(३) अनुसार मान्यता प्रस्ताव विद्यापिठाकडे पाठवण्याचे सर्वानुमते ठरले. त्याचप्रमाणे शासन विद्यापिठ परिनियम ४१५(१) अनुसार शासन मान्यता मिळाली त्यावेळेस पदभरती करावी असे ठरले.<br><br>सुचक — प्रा. एस. आर. पाटील<br>अनुमोदक — श्री. बाबासाहेब विनय मधुकर जकातदार |
| | विषय क्र. ७.<br>महाविद्यालयाच्या जुन्या इमारतीत खालच्या ७ खोल्यांच्या स्लॅब दुरुस्ती व आवश्यक दुरुस्ती/रंगकाम करुन घेणेबाबत चर्चा करणे. | सदर विषयाच्या संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य तथा महाविद्यालय विकास समितीचे सदस्य सचिव डॉ. एन. एन. गायकवाड यांनी स्वखर्चाने सदर जुन्या इमारतीच्या आवश्यक दुरुस्त्या, डागडूजी व रंगकाम करुन स्वखुशीने करुन देण्याचे लेखी विनंती सादर केली होती सदर सभेने असे ठरविले की, प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांच्या लेखी विनंती अर्जानुसार ७ खोली इमारतीचे छत दुरुस्ती, डागडूजी व रंगकाम बाजारभावाप्रमाणे जो काही खर्च येईल तो सर्व प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी परस्पर करावा असे सर्वानुमते ठरले.<br><br>सुचक - प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड.<br>अनुमोदक - श्री. सुनिल रामभाऊ पाटील |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. १९६ ता.१० /११ /२०२१.

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | विषय क्र. ८<br>शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांच्या आलेल्या अर्जावर विचार विनिमय करणे | १) महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटना शाखा- भडगाव जि. जळगाव येथील धों. र. ना. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भडगाव यांच्या वतीने अध्यक्ष श्री. दिलीप राठोड तसेच व म. सचिव श्री अरुण शिवराम माळी यांच्या संयुक्त सही निशी दि. २३-१०-२०२१ रोजी महाविद्यालयात प्राप्त अर्जानुसार सभेमध्ये चर्चा करून असे ठरले की, यापूर्वी पर्यंत शिक्षकेतर प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेले महाविद्यालय विकास समिती सदस्य श्री सुनिल रामभाऊ पा. यांचा कार्यकाल संपल्यामुळे त्यांच्या संघटनेच्या एकत्रित विचार व बैठकीतील ठरावानुसार श्री पाटील यांचे जेवढी उर्वरित कालावधीसाठी श्री. दिलीप नथू चौधरी यांची महा. विकास समिती शिक्षकेतर कर्मचारी सदस्य म्हणून केलेली नियुक्ती मान्य करण्यात यावी व यापुढे श्री दिलीप नथू चौधरी हे (N.T.S) महा. विकास समितीचे सदस्य असतील असे सर्वानुमते मान्य केले.<br>२) प्रा. डि. एच. तोंडे (शा. शि. संचालक) यांच्या दि. ८-११-२०२१ च्या अर्जावर विचार करण्यात येऊन असे सर्वानुमते ठरले की, सदर अर्ज म. प्राचार्य यांचे शिफारशीनुसार सादर केला असल्यामुळे महाविद्यालयाच्या विकास लक्षात घेता प्रा. तोंडे यांच्या विनंतीनुसार महाविद्यालय परिसरात व्यायामशाळा बांधकाम करण्या संदर्भात प्रस्ताव तयार करणेबाबी व सदर प्रस्ताव तयार करून मा. जिल्हा क्रिडा अधिकारी जळगाव यांचे कार्यालयाकडे पाठविणेसाठीचा ठराव करणे व बांधकामास परवानगी देणे होणेसाठी या समितीने विचार विनिमय करून बांधकामास परवानगी देण्याचे सर्वानुमते ठरले<br>३) शा. शि. संचालक प्रा. डि. एच. तोंडे यांच्या दि. ८-११-२०२१ च्या अर्जानुसार महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच IQAC चे समन्वयक प्रा. एन. जी. कोळके यांनी केलेल्या शिफारशीनुसार श्री तोंडे हे CAS साठी सातव्या वेतन आयोगातील स्तर १२ मधून १३A साठीचा कालावधी पुर्ण करत असल्यामुळे यांचा CAS साठीचा प्रस्ताव तयार करून विद्यापीठ |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 195

ता. १०/११/२०२१

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | उ.शि. विभाग सहसंचालक कार्यालय जळगाव यांच्याकडे मान्यतेस्तव पाठवावा असे सर्वानुमते ठरले. |
| | | ४) श्री शिवाजी आपा पाटील सहा. प्राध्यापक इंग्रजी विभाग यांच्या दि ८-११-२०२१ च्या अर्जानुसार सदर विषय सभेपुढे ठेवण्यात आला असता सर्वानुमते असे ठरले की, महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच गुणवत्ता सुधार समितीचे समन्वयक प्रा. एस.जी. कांबळे यांचे शिफारशीअनुसार श्री. शिवाजी पाटील हे CAS साठी पात्र असल्यामुळे त्यांचा स्तर १० मधून स्तर ११ मध्ये जाणेसाठीचा प्रस्ताव विद्यापीठ व उ.शि. सहसंचालक जळगाव यांचे कार्यालयांकडे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करावा असे सर्वानुमते ठरले. |
| | | ५) क. लिपिक श्री एस. केदार यांच्या ९-११-२०२१च्या पत्रानुसार सर्वानुमते असे ठरले की, महाविद्यालयात सुर्त ते एकमेव लिपिक या संवर्गातील कर्मचारी असल्यामुळे महाविद्यालयातील लिपिकेत्तर कर्मचारी श्री अजय देशमुख व श्री दिलीप तडवी या प्रयोगशाळा परिचर कर्मचाऱ्यांना त्यांना मदत व्हावी म्हणून कार्यालयात देखील अतिरिक्त कार्यभार सांभाळण्यासाठी आदेशीत करावे व शासन नविन पदे भरतीसाठी जेव्हा केव्हा मान्यता देईल त्यावेळेस संच मान्यतेप्रमाणे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती करावी सुर्तवरील दोवे व मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सटकार्य घ्यावे असे सर्वानुमते पुन्हा या बैठकीतही ठरले. |
| | | ६) मानधन तत्वावरील कर्मचारी श्री टि.ए. सरजन. तसेच नाईट वॉचमन रघुनाथ नारायण चव्हाण यांना अनुक्रमे १०००/- रु ने मानधन वाट देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. |
| ६ | मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे. | सदरहू आयत्यावेळी कोणताही विषय उपस्थित न झाल्यामुळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदर सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले. व सभेनंतर प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांचे द्वारा आयोजित स्नेहभोजनाचा आस्वाद घेण्याची विनंती प्राचार्यांनी केली. |

[signature] 10/11/2021

प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती
सौ.र.ना.दे. कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, भडगांव जि. जळगाव

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 9196 ता. 05/11/2022

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|

सभा - पहिली

महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची सभा 2022-23 (सभा क्र.1)

महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची सभा नविन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016-च्या कलम 97(1) अन्वये शै.व. 2022-2023 मधील सभा आज दि. 05/11/2022 रोजी दुपारी 04.00 वाजता पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेने चालविलेल्या भडगांव येथील सौ. र. ना. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगांव येथे ~~संपन्न झाली~~ संस्थेचे चेअरमन मा. नानासाहेब संजय ओंकार वाघ यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर सभेस खालीलप्रमाणे मान्यवर उपस्थित होते.

1. श्री. मा. नानासाहेब संजय ओंकार वाघ अध्यक्ष.
2. श्री. मा. नानासाहेब विलास त्र्यंबक जोशी सदस्य (शिक्षणक्षेत्र)
3. श्री. मा. ॲड. दादासाहेब महेश सदाशिवराव देशमुख सदस्य (न्यायविधीक्षेत्र)
4. श्री. मा. आण्णासो. नानासाहेब बपनराव देशमुख सदस्य (संशोधनक्षेत्र)
5. श्री. मा. बाबासो. विनय मधुकर जकातदार सदस्य ~~(संशोधनक्षेत्र)~~ (समाजसेवाक्षेत्र)
6. श्री. मा. आबासो. दत्तात्रय माधवराव पवार सदस्य (उद्योगक्षेत्र)
7. श्री. प्रा. डॉ. एस. डी. भैसे (प्राचार्य किंवा परिसंस्था द्वारे नामनिर्देशित विभाग प्रमुख)
8. श्री. प्रा. सुरेश रामराव पाटील सदस्य (अध्यापक प्रतिनिधी)
9. श्रीमती प्रा. डॉ. चित्रा सुकदेव पाटील सदस्य (अध्यापक महिला प्रतिनिधी)
10. श्री. प्रा. डॉ. दीपक मोतीराम मराठे सदस्य (अध्यापक प्रतिनिधी)
11. श्री. प्रा. डॉ. अविनाश नामदेव भंगाळे सदस्य (अध्यापक प्रतिनिधी) समन्वयक महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता समिती.
12. श्री. दिलीप नथ्थु चौधरी सदस्य (अध्यापकेत्तर प्रतिनिधी)
13. श्री. सभापती महाविद्यालय विद्यार्थी परिषद
14. श्री. सचिव महाविद्यालय विद्यार्थी परिषद
15. श्री. प्राचार्य. डॉ. नाना नामदेव गायकवाड (सदस्य सचिव) 05/11/22

सभेस प्रारंभी पा. ता. सह. शिक्षण संस्थेचे माजी व्हाईस चेअरमन आबासो डॉ. बी. ओ. पाटील, माजी मुख्याध्यापक आर. पी. गुप्तासर, गो. से. हायस्कुलच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. छाया भालचंद्र सुर्यवंशी (पाटील) मॅडम यांना श्रद्धांजली वाहण्यात आली

स्वागत व सत्कारानंतर मा. ताईसो सुचिता वाघ यांना यांना नुकत्याच जाहीर झालेल्या 'लोकमत उमेन्स आचिवर्स' ॲवार्ड 2022 साठी तसेच एसएसएमएम महाविद्यालय पाचोरा येथे नव्याने नियुक्त झालेले प्राचार्य मा. डॉ. शिरिष पा. या दोन्ही मान्यवरांच्या अभिनंदनाचा ठराव पास करण्यात आला तसेच नविन सदस्य म्हणून IQAC समन्वयक प्रा. डॉ. अ. न. भंगाळे (प्रा. प्रतिनिधी) व शिक्षकेतर प्रतिनिधी म्हणून दिलीप चौधरी यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 19? ता. 05/11/2022

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | तद्नंतर मा. अध्यक्ष यांच्या | परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली. |
| | विषय क्र.१ – मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची बैठक दि. ०४-११-२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखविले सर्व उपस्थित सदस्यांनी त्यावर चर्चा करुन इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी दिली. ठराव सर्वानुमते मंजूर<br>सुचक – मा. बाबासो विनय मधुकर जकातदार<br>अनुमोदक – प्रा. डॉ. एस. डी. भैसे |
| | विषय क्र.२. आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या जमाखर्चास मंजूरी देणे | सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा महाविद्यालयाच्या जमाखर्चाचा हिशोब मा. प्राचार्यसो यांनी सभेसमोर सविस्तरपणे वाचून दाखविला त्यावर मा. नानासो व्ही. टी. जोशी यांनी काही मुद्द्यांवर चर्चा केली व त्यानुसार काही सुचनाही केल्या त्या सुचनांचा विचार करुन जमाखर्चास सभेने मान्यता दिली. ठराव मंजूर<br>सुचक – मा. आबासो दत्तात्रय माणिकराव पवार<br>अनुमोदक – प्रा. एस. आर. पाटील |
| | विषय क्र. ३ आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे. | आर्थिक वर्ष २०२२-२३ चे अंदाजपत्रक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी सभेपुढे वाचून दाखविले. सदर अंदाजपत्रकात विविध शिर्षकाखाली अंदाजे ६,२२,९४,२००/- रु. खर्च व प्रचलित पद्धतीचा अवलंब करुन नेहमीप्रमाणे सर्व प्रकारच्या खरेदीसाठी तुलनात्मक पद्धतीने खरेदीचे अधिकार प्राचार्य यांना देण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले, ठराव मंजूर.<br>सुचक – मा. बाबासो विनय मधुकर जकातदार<br>अनुमोदक – प्रा. डॉ. मिना एस. पाटील |
| | विषय क्र. ४ – नॅक (४ cycle) साठी आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेऊन तृतीय | सदर विषयाच्या संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी नॅक (४ cycle) संदर्भात प्रगतीचा आढावा सादर केला. त्याचबरोबर नॅक (४ cycle) समन्वयक प्रा. ए. एन. भंगाळे यांनी आतापर्यंत नॅक |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 19

ता. ०५ / ११ / २०२२

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | मुल्यांकनासाठी खर्चाची तरतुद करणे. मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र एनजीसी/२०२२/नॅक/ अ.शा. अनु. म. वि/औवि/म.वि३/२२०४ दि. ०३-११-२०२२ च्या पत्रावर विचार विनिमय करणे | संदर्भात केलेल्या कामासंदर्भात विस्तृतपणे माहिती सभेपुढे सादर केली त्याचबरोबर मा. शिक्षण संचालक पुणे यांचे दि ०३-११-२०२२ च्या पत्रावर देखील विचारविनिमय करण्यात आला. सर्वानुमते असे ठरले की, आगामी जानेवारी २०२३ मध्ये नॅक बेंगलोर कार्यालयाकडे नॅक (3rd cycle) करून घेणेसाठीचा IIQA सादर करावा व प्रचलित नियमाप्रमाणे पुढे टप्प्या-टप्प्याने एस.एस.आर. सादर करून घेता येईल या संदर्भात विचारविनिमय करण्यात आला. होणाऱ्या खर्चासाठी मा. व्यवस्थापन मंडळ खर्च व्यय करेल असे सर्वानुमते ठरले. आवश्यकतानुसार काही विकास कामांसाठी देणग्या स्विकारण्या संदर्भात देखील विचारविनिमय करण्यात आला.<br><br>ठराव सर्वानुमते मंजूर<br>सुचक - प्रा. एस. आर. पाटील<br>अनुमोदक प्रा. डॉ. एस. डी. भैसे |
| | विषय क्र. ५.<br>महाविद्यालयातील अनुदानित तसेच विना अनुदानित तत्वावर सुरु असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गाच्या विविध विषयाच्या आपल्या पा.ता.सह. शि.सं. पाचोरा ने पहील्या व दुसऱ्या सत्रासाठी (शै. व. २०२२-२३) तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या अधिव्याख्यातांच्या नियुक्तीस मान्यता देऊन त्यांचे प्रस्ताव मान्यतेसाठी क.ब.चौ.उमवि जळगाव येथे पाठविणेबाबत विचारविनिमय करणे. | सदर विषयाच्या संदर्भात सभेचे सदस्यसचिव प्राचार्य यांनी महाविद्यालयातील अनुदानित व विनाअनुदानित वर्गाचे विविध विषयांचे कोर्सेस शिकविले जातात. ही बाब लक्षात घेता महाविद्यालयातील सेवेतुन अनेक विषयांचे प्राध्यापक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. सदर रिक्त पदे भरणे आवश्यक असले तरी अद्यापपावेतो भरती प्रक्रियेस शासकिय धोरणांमुळे विलंब होत असल्यामुळे विद्यापिठ परीनियम ४१५(३) अंतर्गत आवश्यक त्या रिक्त पदांसाठी आगामी शै.व. २०२२-२३ साठी तासिका तत्वावर पहील्या व दुसऱ्या सत्रासाठी घड्याळी तासिकांवर शिक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. जेणेकरुन विद्यार्थी हित साधता येईल. त्याचबरोबर |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 199

ता. ०५/११/२०२१

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | | विद्यापीठ परिनियमाप्रमाणे नियुक्त होणाऱ्या सहायक प्राध्यापकांच्या मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविणेसाठी देखील यास सभेने मान्यता देण्यात आली. ठराव सर्वानुमते मंजूर. सुचक – प्रा. डॉ. ए. एन. भंगाळे अनुमोदक – श्री. डि. एन. चौधरी |
| | **विषय क्र. ६** मानधन तत्वावरिल कर्मचारी यांचे मानधनाचा वार्षिक बोजा लक्षात घेता निधी उभारणी संदर्भात विचार-विनिमय करणे. | या विषयसंदर्भात महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी इंकरीत्च महाविद्यालयास उपलब्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या फी, शिष्यवृत्ती इ. मार्गातून उत्पन्न होणाऱ्या शिर्षकासंदर्भात सभेला सविस्तरपणे आशय सादर केला उत्तरोत्तर वाढीव भार लक्षात घेता उत्पन्नापेक्षा खर्च अधिक लागणार असल्याचे लक्षात येते म्हणून इतर सर्व शासकिय विद्यापिठाच्या फीसच्या प्रचलित पद्धतीने अदा करुन महाविद्यालयाच्या शिक्षणशुल्कांतर्गत शासकिय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची परंपरी भरती होईपावेतो मंजुरी तत्वावर गरजूंना मानधन देऊन तात्पुरत्या स्वरुपाच्या नियुक्त्या करुन द्याव्यात व त्यांना भविष्यात कोणताही अधिकार आम्ही सांगणार नाहीत. अर्थात सदर नियुक्त्यांवर आमच्या कायम अधिकार असणार नाही अशा आशयाचे हमीपत्र घेऊन योग्य त्या मानधन तत्वावर संस्थेशी चर्चा करुन तात्पुरत्या नियुक्तीचे अधिकार प्राचार्यांना देण्यास ही सभा मंजूरी देत आहे. ठराव सर्वानुमते मंजूर. सुचक – प्रा. डॉ. सी. एस. पाटील अनुमोदक – प्रा. एस. आर. पाटील |
| | **विषय क्र. ७** सन २०१६-१७ ते २०२१-२२ पर्यंतच्या अनामत / बाकी रक्कम परत करणे संबंधी विचार-विनिमय करणे | सदर विषयाबाबत असे ठरले की, उत्तरोत्तर कमी होणारी विद्यार्थी संख्या व शिष्यवृत्ती इ. कारणांमुळे आर्थिक भार वाढलेला आहे म्हणून २०१६-१७ ते २०२१-२२ पर्यंतच्या ज्यांच्या अनामती किंवा रकमा देणे बाकी आहेत अशा सर्व रकमा जसजसे महाविद्यालयाकडे शुल्क जमा होईल तसे महाशय व्यवस्थापन मंडळाशी चर्चा करुन |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 200 ता. ०५ / ११ /२०२२

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | त्याच्या-त्याच्याने अदा करण्याचे सर्वानुमते ठरले.<br>ठराव सर्वानुमते मंजूर<br>सुचक – प्रा-डॉ- ए-एन-भंगाळे<br>अनुमोदक – प्रा. एस-आर-पाटील |
| | विषय क्र- ८<br>शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या आलेल्या अर्जावर विचार विनिमय करणे | सदर विषयास अनुसरुन महाविद्यालयाच्या ग्रंथपाल श्रीमती आर-एम-गजभिये व प्रा. शिवाजी चापा पाटील यांचा Academic Level 11 मधून 12 मध्ये जाणेसाठी, डॉ. बी-एस-आलेराव यांचा 12 मधून 13 A मध्ये प्राध्यापक पदाच्या पदोन्नतीसाठी तसेच प्रा-डॉ-एस-डी-भैसे यांचा 13 A मधून 14A मध्ये प्राध्यापक पदाच्या पदोन्नतीसाठी तसेच श्री दिलीप एस तडवी यांचा प्रयोगशाळा परिचर ते प्रयोगशाळा सहाय्यक पदाच्या पदोन्नतीसाठी तसेच श्री. अजय एस-देशमुख यांचा प्रयोगशाळा परिचर ते कनिष्ठलिपिक पदाच्या पदोन्नतीसाठी आलेल्या अर्जावर प्रचलित पद्धती व शासकिय तथा विद्यापिठीय नियमावली अनुसार साधकबाधक चर्चा करण्यात आली व वरिल संबंधितांचे पदोन्नतीसाठीचे प्रस्ताव त्यांच्या प्राधिकरणांकडे मंजुरीस्तव पाठविण्याचे सर्वानुमते ठरले. वरिल सर्व पदोन्नतींमध्ये विद्यापिठ किंवा शासनस्तरावर मान्यता न मिळाल्यास ही सभा जबाबदार राहणार नाही याची जाणिव करुन देऊनच सर्वांचे प्रस्ताव पारित करावे असे सर्वानुमते ठरले. तसेच प्रा-डी-एच-तोंदळे यांचा अनामत रक्कम मिळणेबाबतचा अर्ज देखील सभेपुढे वाचून दाखविण्यात आला वरिल विषय क्र.७ अनुसार रक्कम उपलब्ध होताच अनामत अदा करण्याचे सर्वानुमते ठरले<br>ठराव सर्वानुमते मंजूर<br>सुचक – प्रा-डॉ- एस-डी-भैसे<br>अनुमोदक – प्रा-डॉ- सी-एस-पाटील |

# प्रोसिडींग बुक

सभा नं. 201

ता. ०६/११/२०११

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | विषय क्र. ६. मा. अध्यक्ष महोदय यांच्या पुर्व परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे. | सदर विषया अनुसार आयता वेळेचा कोणताही विषय उपस्थित न झाल्यामुळे खेळीमेळीच्या वातावरणात म. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभा समाप्तीची घोषणा सदस्य सचिव प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड यांनी केली. तसेच सभेचे सदस्य तथा उपप्राचार्य प्रा. एस. आर. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानून राष्ट्रगीताने सभा संपन्न झाली |

प्राचार्य / सदस्य सचिव
महाविद्यालय विकास समिती
सौ.र.ना.दे. कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, भडगाव जि. जळगाव

# प्रोसिडींग बुक

सभा नं. २ ता. 27/03/2023

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|

सभा- दुसरी

महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची सभा क्र.२. सन 2022-23 नविन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६च्या कलम 97(1)अन्वये शै. वर्ष 2022-23 मधील दुसरी सभा आज दि.२५-३-२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था पाचोरा ने चालविलेल्या भडगाव येथील सौ. र.ना. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भडगाव येथे संस्थेचे चेअरमन मा. नानासो संजय ओंकार वाघ यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली सदर सभेस खालीलप्रमाणे मान्यवर उपस्थित होते.

१ श्री मा. नानासो संजय ओंकार वाघ - अध्यक्ष -
२ श्री मा. नानासो विकास त्र्यंबक जोशी - सदस्य (शिक्षण क्षेत्र)
३ श्री मा. ॲड. दादासो महेश सदाशिवराव देशमुख (~~संशोधन क्षेत्र~~ न्यायविधी) (सदस्य) -
४ श्री मा. आण्णासो नानासाहेब बबनराव देशमुख (संशोधन क्षेत्र) (सदस्य) -
५ श्री मा. बाबासो विनय मधुकर जकातदार (समाजसेवा क्षेत्र) (सदस्य) -
६ श्री मा. आबासो दत्तात्रय माणिकराव पवार सदस्य (उद्योग क्षेत्र) -
७ श्री प्रा. डॉ. संजय देविदास भैसे (प्राचार्य किंवा परिसंस्था प्रमुखाद्वारे नामनिर्देशित विभाग प्रमुख) (सदस्य)
८ श्री प्रा. सुरेश रामराव पाटील (अध्यापक प्रतिनिधी) (सदस्य) -
९ श्री प्रा. डॉ. दिपक मोतीराम मराठे (सदस्य) (अध्यापक प्रतिनिधी) -
१० श्रीमती प्रा. डॉ. चित्रा सुकदेव पा. (सदस्य) (अध्यापक महीला प्रतिनिधी) -
११ श्री प्रा. डॉ. अविनाश नामदेव भंगाळे (समन्वयक, महीला अंतर्गत गुणवत्ता हमी समिती) -
१२ श्री दिलीप नथ्थू चौधरी - सदस्य - (अध्यापकेतर प्रतिनिधी) -

मा. श्री. प्राचार्य डॉ. नाना नामदेव गायकवाड - सदस्य सचिव - 27/03/2023